म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ११३८४

IRBK 0111394
IRBK-0111394




माधव कानिटकर


११३९४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधी | १ |
| २ | लोकमान्य टिळक | १७ |
| ३ | जवाहरलाल नेहरू | ३२ |
| ४ | विजयालक्ष्मी पंडित | ४७ |
| ५ | राजेन्द्र प्रसाद | ६१ |
| ६ | रवींद्रनाथ टागोर | ७५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नोंद दि. ........

# महात्मा गांधी



IRBK-0111394

## राष्ट्रपिता

गांधीजींचें नांव कुणाला ठाऊक नाहीं ? केवळ आपल्या देशांतच नव्हे तर साऱ्या जगांत प्रत्येक सुशिक्षित माणसाला गांधीजींचें नांव ठाऊक आहे. आपल्या देशांत तर चार वर्षांचा छोटा बाळहि गांधीजींचें चित्र ओळखतो. गांधीजी होतेच तसे. आपल्या देशांतले ते एक थोर

महापुरुष होते. लोकमान्य टिळकांनंतर गांधीजीइतका थोर पुढारी देशाला लाभला हें आपलें भाग्यच म्हणावयाचें, दुसरें काय ?

गांधीजींनीं प्रथम आफ्रिकेंत आणि नंतर इकडे देशसेवा करण्यांतच आपलें जीवत व्यतीत केलें. जेथें जेथें हिंदी माणूस आहे तेथें तेथें गांधीजी आहेत ! आफ्रिकेंतील हिंदी बांधवांची गोऱ्यांच्या छळापासून मुक्तता व्हावी म्हणून गांधीजींनीं आफ्रिकेंत हालअपेष्टा सोसल्या, देहदंड सहन केला. भारतालाहि संपूर्ण स्वातंत्र्याची प्राप्ती व्हावी, सत्य आणि अहिंसेच्या मार्गानें या देशानें जावें म्हणून गांधीजींनीं आपलें सर्व आयुष्य वेचलें. ब्रिटिश सरकारशीं झुंजून त्यांनीं शेवटीं ब्रिटिशांना भारतांतून हद्दपार केलें व तिरंगी निशाण दिल्लीवर चढवलें. ही कामगिरी अवघ्या पंचवीस वर्षांत फक्त गांधीजीच करूं शकले, दुसऱ्या कोणाला ती साधती ना. म्हणून आपण गांधीजींना राष्ट्रपिता म्हणतों. आपल्या देशाचे त्यांना पिताजी समजतों. या अलौकिक पुरुषास ही पदवी सार्थच नाहीं कां ?

**बालपण**

गांधीजींचें संपूर्ण नांव मोहनदास करमचंद गांधी. त्यांचे वडील करमचंदजी गांधी राजकोटचे दिवाण होते. गांधीजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजीं गुजराथमध्यें पोरबंदर गांवीं झाला. अहमदाबादेंत आपलें प्राथमिक व दुय्यम शिक्षण संपवून १८८७ मध्यें गांधीजी मॅट्रिक झाले; व भावनगरच्या शामळदास कॉलेजांत नांव नोंदविलें.

पण नंतर विचार बदलला. कॉलेजांत जाऊन चार पांच वर्षांनीं साधा वकील होण्यापेक्षां आतांच इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन यावें असें गांधीजींच्या मनानें घेतलें. वडील आणि आजोबा यांच्याप्रमाणें दिवाण व्हावयाचें असेल तर परदेशी जाऊन शिकून आलें पाहिजे हा विचार त्यांच्या मनांतून जाईना. पैशाची अडचण भावानें व पत्नीनें दूर केली पण आई परवानगी देईना. समुद्रपर्यटन हिंदुशास्त्राला मान्य नव्हतें.

## शिक्षण

अखेर गांधीजींच्या मातोश्रींनीं गांधीजींना इंग्लंडला जाण्यास परवानगी देली, पण 'मांसाहार, मादिरापान आणि स्त्रिया यांपासून अलिप्त राहीन' असं गांधीजींनीं कबूल केलं तेव्हांच !

त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें गांधीजींचें लग्न अल्पवयांतच झालें होतें. बाराव्या वर्षीच गांधीजींचा कस्तुरबांशीं विवाह झाला होता. गांधीजी इंग्लंडला निघाले तेव्हां एका मुलाचे ते पिता होते. ४ सप्टेंबर १८८८ रोजीं गांधीजींनीं मुंबई सोडली.

आणि १२ जून १८९१ रोजीं बॅरिस्टरची पदवी संपादन करून गांधीजी भारताला परत आले. मध्यंतरीं गांधीजींची आई वैकुंठवासी झाली होती. आईच्या निधनाची वार्ता मायदेशीं आल्यावर प्रथमच गांधीजींच्या कानावर आली आणि त्यांना धक्का बसला.

## आफ्रिकेचें आमंत्रण

गांधीजींनीं आपल्या बॅरिस्टरीचा आरंभ मुंबईला केला. सहा महिने त्यांनीं मुंबईत काढले. पण बॅरिस्टरीच्या धंद्यासाठीं आवश्यक असलेलें धैर्य गांधीजींजवळ त्यावेळीं नव्हतें, त्यामुळें प्रथम हातीं आलेला खटला त्यांनीं घालवला आणि बॅरिस्टरीच्या फंदांत न पडतां ते सरळ राजकोटला निघून गेले.

याच सुमारास त्यांना आफ्रिकेंतील चाळीस हजार पौन्डांचा दावा मिळाला. पहिल्या वर्गाचा प्रवास, राहाण्याची व जेवण्याची सोय आणि प्रतिमासीं एकशेंपांच पौन्ड पगार ठरला. एक वर्षाचीच मुदत होती आणि काम होतें आफ्रिकेंतील वकिलाला कुळाची बाजू समजावून देणें एवढेंच ! गांधीजींना साऱ्या गोष्टी पटल्या आणि १८९३ च्या एप्रिलमध्यें गांधीजी आफ्रिकेला निघालेहि !

## अन्यायाविरुद्ध लढा

आफ्रिकेला पोंचल्यानंतर डरबानहून गांधीजी प्रिटोरियाला निघाले.

त्यांच्या जवळचें तिकिट अर्थातच पहिल्या वर्गाचें होतें. पण वाटेंत मारीत्सबर्गला गाडी थांबली. तेथें एका युरोपियन उतारूनें गांधीजींना डबा बदलण्यास सांगितलें. आफ्रिकेंत काळया माणसांना पहिल्या वर्गाचा प्रवास करण्याची परवानगी नव्हती. पण गांधीजींना तें मान्य नव्हतें. त्यांनीं डबा बदलण्यास नकार दिला—गांधीजींना धक्के मारून बाहेर काढण्यांत आले! गांधीजी वेटिंगरूममध्यें शिरले—गाडी पुढें निघून गेली!

आफ्रिकेंत गांधीजींचे ठायीं ठायीं गोऱ्या लोकांनीं अपमान केले; मग ते शिग्रामांत बसणें असो वा रेल्वेचा प्रवास असो किंवा हॉटेलमधील जागा असो. सर्वत्र काळया माणसाला मनाई होती. तुच्छतेनें त्याला वागविण्यांत येई. पहिल्या वर्गाचें तिकिट जवळ असूनहि तिसऱ्या वर्गानें प्रवास करावा लागे. क्वचित् गोऱ्या माणसांनींहि गांधीजींना सहानुभूति दाखविली. पण असे प्रसंग फार क्वचित् येत. आफ्रिकेंत फूटपाथवरून देखील फक्त गोऱ्या माणसांनाच चालण्याची परवानगी होती. गांधीजी बॅरिस्टर म्हणून आफ्रिकेंत गेले खरे—पण त्यांनीं काळया माणसांचीच वकिली अधिक केली. काळया माणसांवर होणारा अन्याय नाहींसा व्हावा म्हणून गांधीजींनीं आपल्या सर्व मुक्कामांत झगडा केला.

ज्या दाव्याच्या कामासाठीं गांधीजी आफ्रिकेंत गेले, तो दावा तडजोडीनें सुटला. गांधीजींच्या कार्यावद्दल हिंदी व्यापाऱ्यांनीं त्यांना तेथें निरोपाची प्रचंड मेजवानी दिली.

**बेत बदलला**

आणि मेजवानीच्या वेळींच हिंदी लोकांचा मताधिकार काढून घेण्याचें विधेयक विधिमंडळापुढें सरकारनें आणल्याची कटु बातमी त्यांना कळली. गांधीजींनीं भारताला परत जायचा आपला बेत तत्काळ बदलला आणि ह्या काळया विधेयकाविरूद्ध चळवळ करण्याचा बेत आंखला.

गांधीजींनीं त्या काळ्या विधेयकाविरुद्ध चळवळ करण्याचें ठरवितांच सारी आफ्रिका त्यांच्या पाठीमागें उभी राहिली. विधिमंडळाच्या अध्यक्षाला तहकुबीची तार गेली. हजारों सह्या घेतलेला अर्ज सरकारकडे पाठविण्यांत आला. पण कशाचाच कांहीं उपयोग झाला नाहीं! १८९६ त तेथील दुष्ट दडपशाही सरकारनें तें विधेयक मंजूर करून घेतलेंच!

पण या चळवळीच्या निमित्तानें तेथील हिंदी आणि तद्देशीय आणि इतर आशियाई देशांतील जनतेंत जागृति झाली. काळ्या माणसांना आपल्या हक्कांची जाणीव झाली व त्यांनीं २२ मे १८९४ रोजीं 'नाताळ राष्ट्रीय सभा' स्थापन केली. चळवळीचें माध्यम आफ्रिकेंतील हिंदी बांधवांच्या हातीं देण्याचें महत्कार्य गांधीजींनीं केलें.

## भारताचें लक्ष वेधलें

१८९३ त गांधीजी, भारतीय पुढाऱ्यांची व जनतेची आफ्रिकेंतील लढ्याला सहानुभूति मिळविण्यासाठीं भारतांत आले. आणि भारतीय पुढाऱ्यांचें व जनतेचें लक्ष त्यांनीं त्या लढ्याकडे वेधलें--आणि तेथून गांधीजी जेव्हां परत आफ्रिकेला आले तेव्हां तेथील गोरे लोक गांधीजींना आफ्रिकेंत येऊं देईनात! तेवीस दिवस बोट बंदरांतच—गोरे लोक गांधीजींना बंदरावर उतरूंच देईनात--शेवटीं उतरूं दिलें पण बंदरावर पाऊल टाकतांच दगड आणि कुजकीं अंडीं यांचा गांधीजींवर एकच मारा झाला. त्यांनाहि लोकांनीं झोडपलें--अखेर त्या जंगली गोऱ्यांचें तावडींतून गांधीजींची कशीबशी सुटका झाली!

## फत्तरानंतर फुलें

१८९६ मध्यें गांधीजींवर दगडांचा वर्षाव ज्या गोऱ्यांनीं केला त्याच गोऱ्या लोकांना लगेचच गांधीजींवर फुलांचा वर्षाव करावा लागला. बोअर युद्धांत गांधीजींनीं व त्यांच्या सेवा पथकानें गोऱ्या सैनिकांची अपार सेवाशुश्रूषा केली. इतकी कीं, ब्रिटिश सरकारनें त्याबद्दल गांधीजींना

'केसर इ हिंद' हें खास पदक बहाल केलें! आफ्रिकेंत तर त्यांचे एवढे सत्कारसमारंभ झाले, इतक्या त्यांना भेटी मिळाल्या पण गांधीजींनीं स्वतःला तर कांहीं घेतलें नाहींच पण कस्तुरबांनाहि घेऊं दिलें नाहीं! भारताला परत येतांना भेटीदाखल मिळालेली एकहि वस्तु गांधीजींनीं आणली नव्हती!

आफ्रिकेंत त्यानंतर १९१५ पर्यन्त गांधीजींनीं अनेक काळ्या कायद्याबद्दल आफ्रिकेंत लढे दिले. ख्रिस्त पद्धतीनेंच विवाह नोंदवले पाहिजेत, दाही बोटांचे ठसे देऊन प्रत्येक आठ वर्षांवरील हिंदी माणसानें नोंदणी करून घेतली पाहिजे असे कायदे तेथील आफ्रिकन सरकारनें हिंदी लोकांच्या माथीं मारले. पण गांधीजींनीं सत्याग्रहाचा मार्ग अविलंबला, विराट चळवळी केल्या व कायदा बदलून घेतला. गांधीजींना या चळवळींत अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, स्वकीयांकडूनहि मार खावा लागला पण गांधीजी आपल्या तत्त्वांपासून ढळले नाहींत.

भारतांत आले तरी तेथील चळवळींत प्रत्यक्ष कार्याला गांधीजींनीं आरंभ केला नव्हता. भारतांतील त्यांच्या लढ्याला खऱ्या अर्थानें सुरुवात झाली ती ४ फेब्रुवारी १९१६ रोजीं.

**पदवीदान**

त्या दिवशीं काय होतें? त्या दिवशीं काशीच्या हिंदु विद्यापीठाचा पदवीदान समारंभ होता. भारतांतील बहुतेक संस्थानिक या समारंभाला हजर होतेच पण शिवाय त्या वेळचे व्हाईसरॉय हार्डिंजहि हजर होते. पहिला दिवस संपला. दुसऱ्या दिवशीं दरभंग्याच्या महाराजांच्या अध्यक्षतेखालीं भाषणें सुरू झालीं. संस्थानिकांनीं स्तुतीची आतषबाजी केल्यानंतर डॉ. बेझंट यांचें हेलावणारें भाषण झालें, नि त्यानंतर गांधीजी! काठेवाडी फेटा घातलेला हा सुदामदेव उभा राहिला आणि सर्वांनाच धारेवर धरले, संस्थानिकहि नि ब्रिटिश राज्यकर्तेहि!

गांधीजींच्या भारतांतील विराट कार्याची ही सुरुवात होती!

## चंपारण्याची हांक

यानंतर गांधीजी पुन्हां एकदम प्रसिद्धीच्या शिखरावर आले चम्पारण्य सत्याग्रहामुळें. चंपारण्यांतील उसाच्या नि निळीच्या मळ्यांत कष्टणाऱ्या आणि गोऱ्यांच्या हाल सोसणाऱ्या शेतकऱ्यांची हांक साऱ्या देशांत गांधीजींनीं प्रथम ऐकली. गांधीजी तडक पाटण्याला रवाना झाले आणि तेथून चंपारण्य.

चंपारण्यांतील शेतकरी वर्गानें गांधीजींचें प्रचंड उत्साहानें स्वागत केलें. सरकारला ते कसें बघवणार? सरकारनें चंपारण्यांत प्रवेश करण्यास मनाई केली!

पण आफ्रिकेंतील गोऱ्या दडपशाहीला ज्यांनीं जुमानलें नाहीं तो इथें थोडेंच जुमानणार? गांधीजींनीं मनाई हुकूम मोडण्याचा निश्चय केला. त्यांनीं बेधडक चंपारण्यांत प्रवेश केला. रक्तानें लिहिल्या जाणाऱ्या, अश्रूंनीं लिहिल्या जाणाऱ्या असंख्य कहाण्या ते कागदावर उतरवूं लागले. खटला झाला. गांधीजींनीं गुन्हा कबूल केला, पण 'चंपारण्य सोडणार नाहीं' कार्य पुढें सुरू झालें. साडेआठशें खेड्यांतील आठ हजार शेतकऱ्यांनीं आपल्या रक्तानीं आणि अश्रूंनीं ओथंबलेल्या कहाण्या गांधीजींना ऐकवल्या. शेतकरी निर्भय झाले; आणि मळेवाले भयभीत झाले!

१३ जून १९१७ रोजीं सरकारनें या बाबतींत चौकशी करण्यासाठीं समिति नेमली. गांधीजी त्या समितीचे सदस्य होते. हजारों शेतकरी आपली कैफियत मांडण्यासाठीं कार्यालयापाशीं जमत. समितीनें साक्षी पुरावे, सूचना या सर्वांचा विचार करून खंडवाढ केली जावी, वेठबिगार रद्द करावी आणि शंभर वर्षांचा जुना तीन कठिणांचा कायदा रद्द करावा अशी सरकारला शिफारस केली. सरकारनें ती मान्यहि केली.

गांधीजींचा हा पहिला विजय.

## आणखी एक विजय

या विजयापाठोपाठ अहमदाबादच्या गिरणी मजुरांवर अन्याय होत होता तेथें जाऊनहि गांधीजींनीं विजय संपादन केला. संप, उपोषण, सत्याग्रह या मार्गानें जाऊन त्यांना गांधीजींनीं पस्तीस टक्के पगारवाढ करून दिली !

## सैन्य भरती

पण यानंतर मात्र गांधीजींनीं एकदम पवित्रा बदलला. पवित्रा बदलायला कारण झालें तें पहिलें महायुद्ध. या महायुद्धांत इंग्रजांसाठीं हिंदी लोकांनीं लढावें अशी गांधीजींनीं भूमिका घेतली. इंग्लंड म्हणजे लोकशाहीचें माहेरघर. इंग्लंड जगलें तर भारत जगेल ही गांधीजींची दृष्टि. पण त्यांच्या भरती मोहीमेस जनतेनें फारशी साद दिली नाहीं. गांधीजी प्रयत्न करीतच होते. सत्याग्रहाचा उत्साह सैन्यभरतींत कोठून असणार ? पण गांधीजी आपल्या मनाला पटलेल्या तत्त्वासाठीं प्रचार करीत होते. युद्धपरिषदांत भाग घेत होते.

## विश्वासघात

अखेर युद्ध संपलें. इंग्रजांच्या विजयाच्या नौबती झडूं लागल्या. भारतानें केलेलें साह्य ब्रिटिश राज्यकर्ते नेहमींप्रमाणें विसरले. स्वराज्याची भारताची मागणी धुडकावून लावण्यांत आली. द्विदल राज्यपद्धतीचा फुसका बार उडविण्यांत आला—मॉंटफोर्ड अहवालानें अपेक्षांची राखरांगोळी झाली, रौलेट अहवालामुळें नागरिक स्वातंत्र्य नामशेष झालें. भारतानें युद्धांत केलेल्या मदतीबद्दल ही बक्षिशी होती !

आतां मात्र गांधीजींना ब्रिटिशांच्या विश्वासघातकी धोरणाचा निषेध करावासा वाटूं लागला. सत्याग्रहाचें शस्त्र पुन्हां उपसावें असें त्यांच्या मनानें घेतलें आणि वल्लभभाईजवळ त्यांनीं अहमदाबादेस तसें बोलूनहि दाखवलें.

## सत्याग्रह

मनांत आल्यावर कृतींत उतरण्यास किती वेळ? तत्काळ सत्याग्रह समितीची स्थापना झाली. मुंबई प्रांतांतूनच पांचसहाशें स्त्री-पुरुष सत्याग्रही आले. त्यांना गांधीजींनीं सत्य अहिंसेचा उपदेश दिला आणि सत्याग्रहाचें पर्व सुरू झालें.

६ एप्रिलला सत्याग्रह दिन होता. उपास, हरताळ इत्यादि मार्गांनीं जनता आपला असंतोष व्यक्त करीत होती तोंपर्यंन्त ठीक होतें. पण पुढें सत्याग्रहाच्या नांवाखालीं अत्याचार झाले. अहमदाबादेस मजुरांनीं दंगा केला, शिपाई ठार केले. नडियादला रेल्वे रूळ उखडले, सरकारी इमारती जाळल्या गेल्या !

हें ऐकतांच गांधीजींना अपार दुःख झालें. त्यांनीं आपली चूक झाली असें कबूल केलें व तीन दिवस उपोषण केलें.

## भीषण हत्याकांड

गांधीजींच्या आदेशामुळें लोक थांबले, पण सरकार थांबलें नव्हतें. १३ एप्रिल रोजीं अमृतसर येथील जालियनवाला बागेंत हजारोंनीं जमलेल्या जनतेवर डायर या ब्रिटिश अधिकाऱ्यानें गोळ्यांचा वर्षाव केला. शेंकडों लोक या भीषण हत्याकांडांत मृत्यु पावले !

सरकारनें जालियनवाला बागेच्या हत्याकांडाची चौकशी करणाऱ्या समित्या नेमल्या त्या फुसक्या ठरल्या. कॉंग्रेसनें बॅ. दास, बॅ. जयकर, तय्यबजी व गांधीजी या चौघांची खास समिति नेमली. या समितीनें १७०० लोकांच्या साक्षी घेतल्या आणि ६५० लोकांच्या जबान्या घेतल्या. गांधीजींनीं अहोरात्र परिश्रम करून समितीचा अहवाल लिहिला—

—आणि त्यांची खात्री पटली कीं, असहकारितेखेरीज स्वराज्य नाहीं !

## असहकार

१ ऑगस्ट १९२० रोजीं लोकमान्य टिळक गेले, त्याच दिवशीं

गांधीजींनीं असहकारितेच्या लढ्याचें रणशिंग फुंकलें. शाळा, महाविद्यालयें न्यायालयें, विधिमंडळें सर्वत्र असहकार सुरू झाला. याच सुमारास गांधीजींनीं एक कोटी रुपये टिळक स्वराज्य फंड जमविला.

पुढें बार्डोलीचा सत्याग्रह झाला. पण तोहि गांधीजींनीं आंखून दिलेल्या सत्य अहिंसेच्या मार्गानें पुरा होईना. पोलीसचौकी जाळून लोकांनीं एका सबइन्स्पेक्टरला व वीस पोलिसांना जिवंत जाळून टाकले! आतां मात्र हद्द झाली! गांधीजींनीं सत्याग्रह मागें घेण्याची घोषणा केली!

पण म्हणून त्यांची शिक्षा चुकली नाहीं. 'हरिजन' या गांधीजींच्या पत्रांतील कांहीं लेख आक्षेपार्ह ठरवून सरकारनें त्यांच्यावर खटला भरला. ब्रमफील्ड न्यायाधीश होते. त्यांनीं गांधीजींच्या लोकोत्तर गुणांची प्रशंसा केली व त्यांना सहा वर्षें कैदेची शिक्षा ठोठावली!

पण १९२२ सालीं सहा वर्षांची शिक्षा घेण्यासाठीं तुरुंगांत गेलेले गांधीजी दोन वर्षांनींच सुटले. त्यांना जानेवारी १९२४ मध्यें आंतड्याचा विकार झाला असल्याचें डॉक्टरांच्या निदर्शनास आलें. शस्त्रक्रिया करण्यांत आली व लगेच गांधीजींची मुक्तताहि झाली.

स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं विधिमंडळांत शिरूनहि चळवळ करावी असें जवाहरलालजीचे पिताजी मोतीलालजी, व चितरंजन दास यांचें मत होतें. त्या दोघांनीं 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला होता. पण गांधीजींचें मत त्यांना अनुकूल नसलें तरी तिघांची मैत्री अभंग राहिली.

१९२४ च्या बेळगांव कॉंग्रेसचे गांधीजीच अध्यक्ष होते. त्यांनीं त्या वेळच्या लहानशा भाषणांत सत्याग्रहावर विशेष जोर दिला.

### मिठासाठीं सत्याग्रह

यानंतर गांधीजींनीं मीठ सत्याग्रह केला. मिठावर त्यावेळीं ब्रिटिश सरकारनें जबरदस्त कर बसवला होता. मीठ कोणाला लागत नाहीं? मीठ सर्वांनाच हवें, लहानांना हवें, थोरांना हवें, श्रीमंतांना हवें, गरिबांना हवें!

गांधीजींनीं या कराराविरुद्ध चळवळीचें प्रस्थान ठेवलें. ६ एप्रिल १९३० रोजीं गांधीजींनीं मिठाचा कायदा मोडला. गांधीजींनीं मीठ सत्याग्रहाला आरंभ केल्याबरोबर देशांत सर्वत्र त्याचे पडसाद उमटले. ठिकठिकाणीं मिठागरांवर स्वयंसेवकांनीं हल्ले केले. ४ मे १९३० ला गांधीजींना अटक झाली. सर्वत्र हरताळ, संप, निदर्शनें सुरू झालीं. दडपशाहीचा त्रास सुरू झाला. गोळ्या आणि लाठी हल्ले याशिवाय सरकार बोलेना! सप्रू जयकरांनीं याचवेळीं तडजोडीसाठीं यत्न केले.

–२५ जानेवारी १९३१ रोजीं गांधीजी सुटले. गांधीजींबरोबर त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं बोलणीं केलीं. गांधी-आयर्विन करार झाला. नागरिकांना स्वतःपुरतें मीठ मोफत गोळा करण्याची परवानगी मिळाली.

गांधीजींचा आणखी एक विजय झाला!

## लंडनची बैठक

१९३१ च्या उत्तरार्धांत गोलमेज परिषदेसाठीं गांधीजी इंग्लंडला गेले. मागं गेले होते तेव्हां ते बॅरिस्टर होण्यासाठीं. या वेळीं गांधीजींनीं आंग्ल-भूमीवर पाऊल टाकलें तें हिंदी राष्ट्राचा सेनापति म्हणून! समान पातळी-वरून बोलणीं करण्यासाठीं!

गोलमेज परिषदेंत अनेक गोष्टींवर चर्चा झाली. गांधीजींनीं आपल्या मागण्या तेथें निर्भयपणें मांडल्या. पूर्ण स्वातंत्र्याची त्यांनीं मागणी केली नि अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ नाकारला, याचा परिणाम व्हायचा तोच झाला. कोणतीहि तडजोड न करतां गांधीजी २८ डिसेंबर १९३१ रोजीं परत आले!

परत आले तों येथें अटकेचें ताट वाढूनच ठेवलेलें होतें. जवाहरलाल, सुभाषचंद्र, राजेंद्रप्रसाद, वल्लभभाई या ज्येष्ठ पुढाऱ्यांना पकडून त्यांच्या-वर खटलेहि झाले होते. गांधीजी भारतांत येतांच ३ जानेवारी १९३२ रोजीं त्यांनाहि अटक झाली!

## संयुक्त मतदार संघच हवा

गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत होते. ऑगस्ट महिना उजाडला. सरकारनें एकदा मनांत योजलेला अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदारसंघ कार्यवाहींत आणला—गांधीजींना धक्का बसला ! त्या निर्णयांत गांधीजी अस्वस्थ झाले. बेचैन झाले. त्यांनीं विचार केला नि हा निर्णय बदलून घेण्यासाठीं प्राणांतिक उपोषणाचा निश्चय केला. इंग्लंडच्या मुख्य प्रधानाला पत्र गेलें नि दिनांक २० सप्टेंबर रोजीं गांधीजींनीं आपल्या ऐतिहासिक उपोषणास आरंभ केला.

डॉ. आंबेडकरांचा संयुक्त मतदार संघाला विरोध होता. पहिले दोन तीन दिवस तो टिकलाहि. पण पुढें आंबेडकरांनाहि आपला विचार बदलावा लागला. २६ सप्टेंबर रोजीं तडजोड झाली. येरवडा करारान्वयें संयुक्त मतदार संघ कायम राहिला. गांधीजींना पुन्हा एकदां विजयश्रीनें माळ घातली.

यानंतर जवळजवळ पांच सहा वर्षें गांधीजी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यांत मग्न होते. त्यांनीं 'हरिजन' साप्ताहिक सुरू केलें. दोनदां त्यांनीं उपवास केला. पुण्याला तर एकदा त्यांच्यावर बॉम्ब फेंकण्याचाहि प्रयत्न झाला. पण अस्पृश्योद्धारक गांधीजी या सर्वांतून बचावले. मध्यंतरीं वैयक्तिक कायदेभंगासाठीं गांधीजींना वर्षाची शिक्षा झाली होती. ती शिक्षाहि उपोषणानेंच संपली.

## विधायक कार्य

१९३४ पासून गांधीजींनीं कॉंग्रेस सोडली. स्वतःला विधायक कार्यांत वाहून घेण्याचें ठरविलें. सेवाग्रामच्या आश्रमाची उभारणी झाली. जातीय ऐक्य, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी, ग्रामोद्योग, खेड्यांचें आरोग्य, प्रौढ शिक्षण, स्त्रियांचा उद्धार, आरोग्य व शरीरस्वास्थ्य यांचें शिक्षण, राष्ट्रभाषा प्रचार, मातृभाषा प्रेम आणि आर्थिक विषमतेचें निराकरण अशीं अठरा विधायक कार्यें गांधीजींनीं आपल्यासाठीं निवडलीं व त्यांत ते रमूं लागले.

## राष्ट्रीय मंत्रिमंडळें

१९३६ ची राष्ट्रसभा–कॉंग्रेस–खेड्यांत फैजपूरला भरली. पस्तीसच्या स्वराज्यदानाच्या कायद्याचा या अधिवेशनांत विचार झाला. कॉंग्रेसनें हें लढविण्याचें ठरविलें. निवडणुकीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला.

आणि कॉंग्रेस आठ प्रांतांत बहुमतानें निवडून आली. पंजाब, सिंध व बंगाल हे तीन प्रांत वगळून सर्वत्र कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें अधिकारावर आली. मिठावरील कर कमी झाला, दारूबंदी झाली. व्याजाचा दर सरकारनें ठरवून शेतकऱ्यांना निश्चिंत केलें. हरिजनोद्धाराचे अनेक कायदे झाले. क्रांतिमार्गानें लढणारे शेकडों राजबंदी मुक्त झाले आणि कॉंग्रेसचें राज्य हें तेव्हां रामराज्य ठरलें !

पण हळूहळू वातावरण बदलूं लागलें. आकाशांत युद्धाचे ढग जमूं लागले. इंग्लंडनें युद्धांत उडी घेतली. पण पूर्ण स्वातंत्र्याची मागणी मान्य केल्याशिवाय कॉंग्रेस इंग्लंडला सहकार्य देईना. सरकारला तें मान्य नव्हतें. सर्वत्र कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले.

आणि पुन्हा चळवळीसाठीं दंड थोपटले. १९४० सालीं वैयक्तिक सत्याग्रह सुरू झाला. १९४१ मध्यें प्रातिनिधिक सत्याग्रहाची ज्योत पेटली. हजारों सत्याग्रहींनीं तुरुंगवास पत्करला. सरकारला विरोधाची जाणीव झाली. सर क्रिप्सना तडजोडीसाठीं भारतांत पाठविण्यांत आले. पण त्यांची योजना सरकारनें नाकारली.

आतां यापुढें जें घडणार होतें तें अटळ होतें, लढा सर्वांना हवा होता. ब्रिटिशांशीं झुंजायला सर्वजण सिद्ध होते. गांधीजींच्या आदेशाची वाट पाहात होते.

आणि गांधीजींनीं ८ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबईला 'चले जाव' ची प्रचंड गर्जना केली. बेचाळीसची चळवळ सुरू झाली. नेत्यांना पकडण्यांत आलें. देशभर हरताळ, संप, निदर्शनें सुरू झाली. समाजवादी

कार्यकर्ते भूमिगत झाले. गुप्त रेडिओ केंद्रहि सुरू झालें. देश वणव्या-सारखा पेटला. कांहीं ठिकाणीं तर प्रति सरकारेंहि स्थापन झालीं.

येरवड्याला आगाखान बंगल्यांत गांधीजींना ठेवण्यांत आले होते. त्यांच्याजवळ कस्तुरबा, त्यांचे चिटणीस महादेवभाई देसाई, सरोजिनी नायडू इत्यादि मंडळी होती.

पण तुरुंगांत आल्यावर १५ तारखेलाच महादेवभाई देसाई गेले. गांधीजींचे ते उजवे हात. गांधीजींना ते पित्याच्या ठिकाणीं मानित. गांधीजींनीं शोक आवरला आणि पुन्हा ते दैनंदिन कार्याला लागले.

त्यानंतर १६ फेब्रुवारी १९४३ रोजीं गांधीजींच्या पत्नी कस्तुरबाहि स्वर्गस्थ झाल्या. महादेवभाई आणि कस्तुरबा दोघांच्याहि समाध्या तेथें उभारण्यांत आल्या.

याच कस्तुरबांच्या स्मरणार्थ जनतेनें एक कोटी बारा लाखांचा कस्तुरबा निधि जमविला. त्याचा विनियोग स्त्रिया व मुलें यांच्या औषधो-पचारासाठीं केला जात आहे.

६ मे १९४४ रोजीं प्राणांतिक उपोषणानंतर गांधीजींची येरवडा तुरुंगांतून बिनशर्त सुटका झाली. लगेच चक्रें फिरूं लागलीं. इतर राज-बंदीहि सुटले. नेहरू, वल्लभभाई, जयप्रकाश, आदि सर्व ज्येष्ठ नेते मुक्त झाले. इंग्लंडनें जर्मनी, व जपानचा युद्धांत पराभव केला आणि जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालीं हंगामी सरकार दिल्लीला स्थापन झालें. पुन्हा कॉंग्रेस मंत्रिमंडळें अधिकारावर आलीं. निरनिराळ्या योजना आल्या नि गेल्या. शेवटीं मॉऊंटबॅटनची योजना नक्की झाली. देश स्वतंत्र झाला. पाकिस्तान जन्माला आलें.

गांधीजींचा फाळणीला कट्टर विरोध होता. प्रत्यक्ष कृतीनें मुस्लिम लीगच्या धोरणामुळें देशाचे दोन तुकडे पाडावे लागले. देश नष्ट होण्यापेक्षां फाळणी स्वीकारणें शेवटीं इष्ट ठरलें व भारत स्वतंत्र झाला. तिरंगी निशाण दिल्लीवर डोलूं लागलें. १५ ऑगस्ट १९४७ हा तो दिवस.

पण गांधीजी कुठें होते ? बंगालमध्यें, नौखालींत हिंदुमुस्लिमांना शांत करीत होते. उपोषणानें हृदयें जिंकीत होते. जिथें रक्ताचा सडा पडला होता तेथें फुलें निर्मू पाहात होते. गांधीजींना यश मिळालें.

गांधीजी सप्टेंबरमध्यें दिल्लीला परतले. त्या वेळीं दिल्लींत जातीय दंगलीचा अग्नि धुमसत होता. पराभूत झालेले, डिवचलेले हिंदु निर्वासित मुस्लिमांवर सूड घेत होते. दिल्लींत राज्यकारभार उरला नव्हता, दंगलींना ऊत आला होता. पोलीस आणि लष्कर नाकाम ठरलें होतें. काश्मीर प्रकरण निघालें. भारतावर पाकिस्ताननें काश्मीर आघाडीवर चढाई केली होती. मंत्रिमंडळाचें स्थान धोक्यांत आलें होतें.

गांधीजी दिल्लीला आले आणि त्यांनीं उतारा म्हणून उपोषणाची घोषणा केली. गांधीजींचें हें सोळावें व अखेरचें उपोषण. १० जानेवारी १९४८ ला तें सुरू झालें. १८ जानेवारी १९४८ रोजीं सन्मान्य तड-जोडीवर संपलें. मुस्लिमांना भारतांत निर्भयपणें वावरतां यावें म्हणून गांधीजींची ही धडपड !

अखेर तो दिवस उगवला. ३० जानेवारी १९४८ या दिवशीं गोडसेनें गांधीजींवर पिस्तुल चालवलें. एक थोर महात्मा पिस्तुलांतल्या गोळीला बळी पडला.. आणि पाहतां पाहतां हुतात्मा झाला. गांधीजींना येशू ख्रिस्ताचें, लिंकनचें मरण आलें. एक दिव्य ज्योत विझली ! छे, अमर झाली ! दिल्लीला प्रार्थनेच्यावेळीं मुखांत ‘ रामनाम ’ म्हणतच गांधीजी गेले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊन गांधीजी गेले पण स्वतंत्र भार-ताची कर्तबगारी मात्र पाहायला आपल्यांत राहिले नाहींत.

◆ ◆ ◆

# लोकमान्य टिळक



## मार्गदर्शक दीपगृह

• नुकताच आपल्या देशांत टिळकांचा जन्मशताब्दि उत्सव मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. लोकमान्य टिळकांच्या जन्माला १९५६ सालीं शंभर वर्षें पूर्ण झालीं. आपल्या कीर्तीची ध्वजा सतत फडकत ठेवणारे जे थोडे महापुरुष या देशांत होऊन गेले, त्यांत लोकमान्य

टिळकांची गणना होते. लोकमान्य टिळकांची बुद्धि जशी प्रखर होती तशी त्यांची देशभक्तीहि प्रखर होती. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच' हा महान् मंत्र लोकमान्य टिळकांनींच भारताला दिला. आपलें सर्व आयुष्य त्यांनीं देशासाठीं खर्च केलें. आपल्या देशाला स्वराज्याची प्राप्ती व्हावी म्हणून टिळकांनीं देहदंड सोसला व देशाच्या स्वातंत्र्यासाठीं परकीय सत्तेशीं झगडतां झगडतांच देहत्याग केला.

टिळकांचें सारें जीवन एखाद्या दीपगृहासारखें आहे. ज्याप्रमाणें समुद्रांत असलेलें दीपगृह प्रवासी नौकांना मार्गदर्शन करते, संकटांपासून वांचविते त्याप्रमाणें टिळकांचें जीवन हें भारताला सतत मार्गदर्शन करीत आलें आहे. देशाच्यासाठीं वैयक्तिक सुखाचा त्याग करण्याची, देशासाठीं सर्वस्व वेंचण्याची महान् शिकवण लोकमान्य टिळकांनींच प्रथम दिली.

### बालपण व शिक्षण

टिळकांचें संपूर्ण नांव बाळ गंगाधर टिळक. त्यांचा जन्म बुधवार दिनांक २३ जुलै १८५६ रोजीं कोंकणांतील दापोली तालुक्यांतील चिखलगांव या लहानशा गांवांत झाला. टिळकांच्या वडिलांचें नांव गंगाधरशास्त्री. गंगाधरशास्त्री मोठे पंडित होते. मराठी शाळेंतील शिक्षक म्हणून त्यांनीं नोकरीस सुरुवात केली व अखेरीस असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर झाले. टिळकांच्या आईचें नांव पार्वतीबाई. त्यांची सूर्य या देवतेवर विलक्षण भक्ति होती. टिळक दहा वर्षांचें असतांनाच त्यांची आई गेली व सोळाव्या वर्षी वडील गेले !

टिळकांचा अभ्यास शाळेंत जाण्यापूर्वीं घरींच सुरू झाला. गंगाधरशास्त्र्यांचें संस्कृत व गणित हे विषय आवडते होते. हे विषय त्यांनीं टिळकांना शिकवण्यास प्रारंभ केला व टिळकांसारख्या हुशार विद्यार्थ्यानें अल्पावधींत ते विषय ग्रहण केले.

पंधराव्या वर्षी इंग्रजी शाळेंत असतांनाच टिळकांचें लग्न झालें. त्यावेळीं मुलांमुलींचीं लग्नें फार लवकर करण्याची पद्धति होती. त्या पद्धतीनुसार गंगाधरशास्त्र्यांनीं टिळकांचें लग्न टिळकांच्या पंधराव्या वर्षी उरकून टाकलें. लाडघरच्या 'बाळ' घराण्यांतील तापी ही कन्या टिळकांची पत्नी झाली. तापी बाळ ही 'सत्यभामा टिळक' झाली व तिनें टिळकांच्या घरांत प्रवेश केला.

लग्न झालें तरी टिळकांच्या शिक्षणांत खंड पडला नाहीं. संस्कृत व गणित या विषयांत प्रावीण्य दाखवीत टिळकांनीं आपलें दुय्यम शिक्षण पूर्ण केलें, व पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत महाविद्यालयीन शिक्षणासाठीं प्रवेश केला.

**डेक्कन कॉलेजांत**

डेक्कन कॉलेज हे पूर्वीपासून विलासी व चैनी विद्यार्थ्यांचें कॉलेज म्हणून प्रसिद्ध आहे. या कॉलेजांतील बहुतेक विद्यार्थी विवाहित व श्रीमंत असत. विद्यार्जन, तें देखील डेक्कन कॉलेजांत जाऊन करणें हें विद्यार्थी वेळ घालविण्यासाठीं करत !

पण टिळक त्यांतले नव्हते. विद्यार्जनासाठींच त्यांनीं डेक्कन कॉलेजांत पाऊल टाकलें. आपल्या प्राध्यापकांत त्यांनीं बुद्धिमान विद्यार्थी म्हणून लौकिक मिळवला व विद्यार्थ्यांतहि प्रिय झाले. कॉलेजच्या वसतिगृहांत असतांना त्यांनीं सहकारी विद्यार्थ्यांच्या सहाय्यानें इतर नाजुक साजुक विद्यार्थ्यांची खूप कानउघाडणी केली पण ती देखील हंसतखेळत ! कॉलेजचें पहिलें वर्ष त्यांनीं अंगमेहनतीस दिलें. त्या सबंध वर्षांत टिळकांनीं आपली प्रकृति सुधारली. व्यायाम व दुग्धपान यांतच त्यांनीं आपलें कॉलेजचें पहिलें वर्ष घालवलें. पण त्याचा त्यांना पुढें आयुष्यभर उपयोग झाला. १८७६ मध्यें टिळक पहिल्या वर्गांत बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. १८७९ मध्यें मुंबईच्या लॉ कॉलेजांतून ते एल्‌एल्. बी. झाले, व त्यांच्या आयुष्यांतील महत्त्वाचें पर्व सुरू झालें.

डेक्कन कॉलेजांत असतांना टिळकांच्या आयुष्यांत एक महत्त्वाची गोष्ट घडली आणि ती म्हणजे गोपाळ गणेश आगरकर यांची ओळख ही होय. आगरकरहि त्यावेळीं डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी होते. उच्च पदवीचा लाभ झाल्यावर मान आणि पैसा यांची आशा ठेवून सरकारी नोकरींत प्रवेश न करतां देशसेवेचें असिधाराव्रत अंगिकारावयाचें टिळक आगरकरांनीं ठरवलें तें डेक्कन कॉलेजांतच !

## न्यू इंग्लिश स्कूल

टिळक आगरकरांच्या जोडीला आणखी तिसरा एक महापुरुष या काळांतच होता. त्यांचें नांव विष्णुशास्त्री चिपळूणकर. मराठी भाषेचे शिवाजी असा विष्णुशास्त्र्यांचा सार्थ गौरव करण्यांत येतो. विष्णुशास्त्र्यांनीं निबंधमाला लिहून लोकजागृतीचें कार्य चालविलें होतें. सरकारी नोकरीवर लाथ मारून विष्णुशास्त्र्यांनीं इंग्रजी शाळा काढण्याचा संकल्प केला होता. शाळा हें लोकशिक्षणाचें फार मोठें साधन आहे हें त्यांनीं पुरतें ओळखलें होतें. आगरकरांनीं व टिळकांनीं त्यांना साथ द्यावयाचें कबूल केलें. नाममात्र पगार घेऊन या नव्या शाळेंत शिकविण्याचें दोघांनींहि कबूल केलें व दिनांक १ जानेवारी १८८० रोजीं न्यू इंग्लिश स्कूलचें नवें निशाण उभारलें.— महाराष्ट्राच्या इतिहासांत हा दिवस चिरस्मरणीय होय.

न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झाल्यावर पहातां पहातां त्याची भरभराट होऊं लागली. सरकारी शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या रोडावली. विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेंतहि भरघोंस यश मिळूं लागलें. आपटे यांनीं तर जगन्नाथ शंकरशेट ह्या शिष्यवृत्तीचा सतत शाळेला लाभ करून दिला. आपटे हे शिक्षक पुढें मुख्याध्यापक झाले त्यांनीं शाळेच्या वैशिष्ट्यांत अनेक इतर वैशिष्ट्यांची भर घालून शाळेचा लौकिक वाढवला.

टिळक या शाळेंत शिक्षक होते. पण त्यांचें शिकविणें सामान्य

मुलांना समजत नसे. चिपळूणकरांच्या बाबतींतहि तशी तक्रार होती. आणि याचें कारण अगदीं उघड होतें. टिळक काय किंवा चिपळूणकर काय हे दोघेहि परीक्षेवर दृष्टि ठेवून शिकवीत नसत. ज्ञानदान हें त्यांचें मुख्य धोरण असे. त्यामुळें सहाजिकच परीक्षार्थी विद्यार्थ्यांना त्यांचें शिकविणें तितकेसें पसंत नसे.

शाळेचें वैभव वाढूं लागल्यावर न्यू इंग्लिश स्कूलच्या चालक मंडळींनीं कॉलेज काढण्याची योजना आंखली. शिक्षणसंस्था स्थापणाऱ्या आपल्या मंडळींचें त्यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी असें नामकरण केलें होतें. डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें पुढें फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली व जनतेला शिक्षणाचें आणखी एक क्षेत्र उपलब्ध करून दिलें

**केसरी**

शाळा आणि कॉलेज हीं लोकशिक्षणाचीं साधनें अपुरी पडूं लागली म्हणून कीं काय, टिळक, आगरकर, चिपळूणकरांनीं वर्तमानपत्र काढ-ण्याचा बेत रचला. स्वस्तांतस्वस्त वर्तमानपत्र मराठींत काढण्याचा बेत अखेर पक्का झाला. इंग्रजी साप्ताहिकाचा बेतहि निश्चित करण्यांत आला. वर्तमानपत्रासाठीं आवश्यक असलेली लेखनकला तिघांनाहि अवगत होती. छापखाना मिळविला आणि कार्याची मुहूर्तमेढ केली. मराठी वर्तमानपत्राचें नांव ठरलें केसरी आणि इंग्रजी साप्ताहिकाचें 'मराठा' ठरलें. स्वकीयांत स्वातंत्र्याचा प्रचार करायला हवा तसें परकी-यांनाहि आपलें विचार कळायला हवेंत हा मुख्य हेतु.

केसरी, मराठा दोन्ही वर्तमानपत्रें सुरू झालीं. संपादकांनींच पहिला अंक घरोघरीं वाटला. पत्तेहि स्वहस्तें लिहिले, महाराष्ट्राचीं दुःखें आणि शल्यें चव्हाट्यावर आणण्याचें केसरी हें वर्तमानपत्र मोठें महत्त्वाचें साधन होऊन बसलें. विशेषतः राजकीय दुःखाला वाचा फोडण्यास 'केसरी' हें एकमेव वर्तमानपत्र त्यावेळीं अग्रगण्य ठरलें. बडोदें, कोल्हापूर

आदि मराठी संस्थानांतील कारभारावर केसरीनें मूलग्राही टीका केली त्यांत 'केसरी' कारांना थोडें फार यशहि आलें, पण कोल्हापूर संस्थानच्या बाबतींत मात्र ऐनवेळीं सहकाऱ्यांनीं विश्वासघात केल्यानें अपयश पदरीं घ्यावें लागलें.

**कोल्हापूर प्रकरण**

त्यावेळीं कोल्हापूरचें महाराज शिवाजी महाराज यांना मतिभ्रंश झाला आहे अशी अफवा उठवून त्यांना त्यांच्या कारभाऱ्यांनीं जवळ जवळ नजर कैदेंत ठेवलें. गोऱ्या शिपायांच्या पहाऱ्यांत महाराज सतत असत. डॉक्टरांच्या संमतीशिवाय त्यांना अन्नहि मिळत नसे. महाराजांना हें सहन होत नसे व तत्संबंधित अधिकाऱ्यांची ते निर्भर्त्सना करीत. या कामीं त्यावेळचे कोल्हापूरचे दिवाण माधवराव बर्वे यांचें साहाय्य असावें असा प्रजाजनांना संशय होता. सभा झाल्या, बैठकी झाल्या आणि 'केसरी' कडेहि धांव घेतली. केसरीनें तत्काळ या प्रकरणांत लक्ष घातलें व बर्वे व त्यांचे कारभारी यांच्यावर 'केसरी'नें टीकास्त्र सोडलें!

झालें! याचा परिणाम व्हायचा तोंच झाला! केसरीवर बर्वे दिवाणांनीं अब्रूनुकसानीची फिर्याद केली. त्यावेळीं 'केसरी'चे संपादक आगरकर होते नि 'केसरी'चें भावंड जें 'मराठा' त्याचे संपादकत्व टिळकांकडे होतें. कोल्हापूर प्रकरणांवर दोघांनींहि प्रखरपणें लेखणी चालविली होती. खटला दोघांवरहि भरला गेला.

बर्वे दिवाणानीं एक गोरा बॅरिस्टर आपला वकील नेमला. खटल्याचें काम पुणें व मुंबई अशा दोन्ही ठिकाणीं चाललें. पुराव्याचीं म्हणून जीं पत्रें व कागदपत्र टिळक आगरकरांजवळ होती तीं बनावट ठरलीं व दुसरा 'अस्सल पुरावा कोर्टापुढें आणूं नका' अशी कोल्हापूरच्या सरदार मंडळींनीं गळ घातली व टिळक आगरकरांनीं तें कबूल केलें! अर्थातच खटल्याचा निकाल टिळक आगरकरांविरुद्ध लागून दोघांनाहि चार महिन्यांची शिक्षा झाली. १८८२ हें साल तेव्हां चालूं होतें.

टिळकांच्या आयुष्यांतील ही पहिली तुरुंगवासाची शिक्षा होय. तोंच त्यांच्या खडतर जीवनाचा खऱ्याखुऱ्या अर्थानें प्रारंभ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. टिळक आगरकरांनीं डोंगरी तुरुंगांत जे दिवस काढले त्यावर आगरकरांनीं एक पुस्तकहि लिहिलें आहे.

### ध्येय हरपलें

तुरुंगांतून सुटून आल्यावर टिळक पुन्हां डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणसंस्थेंत लक्ष घालूं लागलें पण आतां पूर्वींचे दिवस राहिलें नव्हतें. टिळक व आगरकर यांच्यांत वाद निर्माण झाला. आपटे हेहि आगरकर पक्षाचेच! शिवाय सोसायटींतील अल्प वेतनावर काम करण्याच्या कल्पनेला सोसायटींत बहुमत नव्हतें. भांडारकर, रानडे इत्यादि व्यक्तीहि आगरकर, आपटे पक्षालाच पाठिंबा देत होत्या. शेवटीं भांडणें विकोपास जाऊन टिळकांनीं सोसायटीचा राजीनामा दिला! टिळकांना सोसायटी सोडतांना अतिशय दुःख झालें. आपलें ध्येय हरपलें असेंच तेव्हां त्यांना वाटलें! त्यांचें यापुढील सर्व आयुष्य राजकारणांत गेलें खरें पण मनापासून टिळक राजकारणांत रमले नाहींत! त्यांना या शिक्षण संस्थेंतच राहून एखाद्या शास्त्रीय विषयाचे प्राध्यापक व्हावयाचे होते. पण तो योग नव्हता!

सोसायटींतून बाहेर पडल्यावर टिळकांनीं हैद्राबादेंत कापसांत भागीदारी घेतली व कायद्याचा वर्ग चालवूं लागले. पुण्यांत त्यांच्या कायद्याच्या वर्गाला येणारे कांहीं विद्यार्थी पुढें मोठे नामांकित वकील झाले. या उद्योगाबरोबरच 'केसरी' 'मराठा' हीं दोन्ही वर्तमानपत्रें टिळकच चालवीत होते. वर्तमानपत्रांवर तीं टिळकांनीं घेतलीं तेव्हां कर्ज होतें, त्यामुळें कर्ज फिटेपर्यंत टिळकांना त्यांपासून फायदा होत नव्हता. पण लोकशिक्षणाचें आणि प्रचाराचें एक उत्कृष्ट साधन त्यांच्या हातांत होतें.

### सरकारला झुकविलें

कोल्हापूर प्रकरणापासून राजकीय दुःखांना वाचा फोडणारे वर्तमानपत्र

म्हणून 'केसरी' चा लौकिक झाला होता. क्रॉफर्ड प्रकरणांतहि 'केसरी' नें केलेल्या कार्यानें पुन्हां एकदां हेंच सिद्ध झालें. क्रॉफर्ड प्रकरणांतील संबंधित मामलेदारांची केसरीनें बाजू उचलून घेतली व सरकारवर टीकास्त्र सोडलें तेव्हां सरकारनें या मामलेदारांची दाद घेतली !

क्रॉफर्ड प्रकरण होतें तरी काय? क्रॉफर्ड हा कोण? क्रॉफर्ड हा एक बुद्धिमान् आणि उदार गोरा गृहस्थ कमिशनरच्या हुद्यावर होता. उदार वा खर्चिक स्वभावामुळें त्याला आपल्या पगाराचा पैसा पुरत नसे. साहजिकच तो लांचलुचपत फार करीत असे व पैसा मिळवीत असे. हे प्रकार पुढें इतके वाढले कीं सरकारला ह्या बाबतींत लक्ष घालणें भाग पडलें ! त्या वेळचे गव्हर्नर लॉर्ड रे यांनींच या कार्यांत पुढाकार घेतला व क्रॉफर्डवर खटला भरला. अर्थात् खटल्यासाठीं पुरावा गोळा करणें आवश्यक होते. पोलिस तें काम करीत होतेच पण क्रॉफर्डला लांच देऊन मामलेदारी मिळविणारे पुष्कळ मामलेदार होते. सरकारनें या मामलेदारांना असें आश्वासन दिलें कीं, तुम्ही क्रॉफर्डला लांच दिल्याचें कबूल करा, तुम्हांला माफीचे साक्षीदार समजून कोणताहि त्रास देणार नाहीं. मामलेदारांनीं तशा साक्षी दिल्या. पण खटल्याचा निकाल वेगळा लागला. क्रॉफर्डवर लांचखोरीचा आरोप शाबीत झाला नाहीं. 'पण त्यानें हाताखालील लोकांकडून कर्ज काढलें तें बरें केलें नाहीं' असें कोर्टानें आपलें मत दिलें ! पुढें क्रॉफर्डला नोकरींतून मुक्त करण्यांत आलें—आणि त्याचबरोबर सरकारनें आपलें वचन मोडलें व मामलेदारांनीं लांच दिली म्हणून त्यांनाहि नोकरींतून कमी केलें !

हा फार मोठा अन्याय होता. ज्यानें लक्षावधि रुपये लांच खाल्ली तो माणूस निर्दोष ठरतो आणि ज्यांनीं जेमतेम हात ओले होतील एवढी लांच दिली, सरकारवर विश्वास ठेवून कोर्टापुढें खरी हकीकत सांगितली त्यांना मात्र शिक्षा !

टिळकांना हा अन्याय सहन झाला नाहीं. त्यांनी सरकारवर टीकास्त्र

अनुक्रम ... दि ...
क्रमांक ...३५३९... नोंद दि ...

सोडलें. मामलदारांची वकिली केली—अखेर सरकार नमलें व कमी केलेल्या मामलेदारांना भरपगारी पेन्शन दिलें !

### आधीं सामाजिक कां राजकीय ?

याच सुमारास आधीं समाज सुधारणा कीं आधीं राजकीय सुधारणा हा टिळक आगरकरांचा वाद सुरू झाला ! टिळकांचें म्हणणें. राजकीय हक्क प्राप्त करून घेतल्यावर सामाजिक सुधारणा केव्हांहि करतां येतील, उलट आगरकरादि मंडळींचें म्हणणें असें कीं, सामाजिक सुधारणा केल्याखेरीज राजकीय सुधारणांना आपण पात्र ठरणार नाहीं. हा वाद त्यावेळीं खूप रंगला. कोणीच माघार घेईना. दोघेहि आपापल्या क्षेत्रांत कार्य करीत होते. टिळक राजकीय सुधारणेचा पाठपुरावा करीत होते तर आगरकर आपल्या ‘ सुधारक ’ पत्रांतून सामाजिक सुधारणेसाठीं तळमळून लिहीत होते.

### राष्ट्रीय उत्सव

१८९४ सालापर्यंत गणेशोत्सव साधारणपणें घरांघरांतून खाजगी रीत्या होत असत. धार्मिक उत्सव म्हणून सार्वजनिक स्वरूप गणेशो-त्सवाला प्राप्त झालें नव्हतें. तें टिळकांनीं प्राप्त करून दिलें. मेळे, व्याख्यानें हे कार्यक्रम सार्वजनिक गणपतींपुढें सर्रास होऊं लागले. लोक-जागृतीचें आणखी एक साधन टिळकांनीं नेत्यांना उपलब्ध करून दिलें. तेव्हांपासूनच गेलीं साठ बासष्ट वर्षें हा गणपतीचा सार्वजनिक उत्सव महाराष्ट्रांत सर्वत्र चालू आहेच, पण भारताच्या अन्य विभागांत वा परदेशांत जेथें जेथें महाराष्ट्रीय लोक आहेत तेथें तेथें गणपति उत्सव करीत आहेत !

गणपति उत्सवाप्रमाणेंच १८९५ पासून शिवाजी महाराजांचा उत्सवाहि टिळकांनीं सुरू केला. याची सुरुवात त्यावर्षीं रायगडावर झाली व पुढें गणशोत्सवाप्रमाणेंच शिवाजीचा उत्सवहि महाराष्ट्रांत सर्वत्र पसरला व लोकप्रिय झाला. वरील दोन्ही उत्सवांच्या यशाचें व लोकप्रियतेचें श्रेय अर्थातच लोकमान्य टिळकांकडे जातें.

## दुष्काळ आणि प्लेग

१८९६ त महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला. टिळकांनीं पुन्हां सरकारला ठोसे लगावण्याचें कार्य सुरू केलें. टिळकांनीं सुचविलेल्या योजना सरकारला पटल्या नाहींत. टिळकांनीं 'सरकारनें दुष्काळांत काय केलें पाहिजे ?' हें सांगणारें 'फॅमिन–कोड' नांवाचें एक मराठी पुस्तक तयार केलें, व त्याच्या सहा हजार प्रति फुकट वाटल्या. सरकारलाहि कांहीं पाठवल्या पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. केसरींत दुष्काळाची तपशीलवार हकिगत येई. जनतेचे कसे हाल होत आहेत व सरकार कसें दुर्लक्ष करीत आहे याची विस्तृत वर्णनें येत. सरकारी अधिकाऱ्यांनीं कोठें उन्मत्त वर्तणूक केली तर त्याचीहि वार्ता केसरींत येई. या सर्व गोष्टींमुळें टिळकांची कीर्ति चहूंकडे पसरली. एक लोककल्याणदक्ष संपादक म्हणून त्यांची सर्वत्र प्रसिद्धि झाली. आलें कीं संकट एक येत नाहीं, अनेक संकटें येतात. महाराष्ट्राचे तेव्हां तसेंच झालें. दुष्काळाच्या पाठोपाठ प्लेगनें महाराष्ट्रावर हल्ला केला. दुष्काळांत उरलेलीं माणसें मारण्यासाठींच जणूं प्लेग आला ! रोग नवीन असल्या-मुळें सरकारला कांहीं सुचेना. माणसें पटापट मरूं लागलीं. अनुभवानें सिद्ध होण्यापूर्वी कांहीं औषधें सरकारनें सक्तीचीं केलीं. गोरे शिपाई उन्मत्तपणें वागूं लागले. टिळकांनीं 'हिंदु–हॉस्पिटल' काढून रोग्यांची व्यवस्था केली. सरकारी अरेरावीचा तीव्र निषेध केला व जनतेच्या हृदयांत सिंहासन मिळविलें.

## रँडचा खून

प्लेगच्या दिवसांत जनतेचा गोऱ्या शिपायांकडून झालेला अमानुष छळ जनता विसरली नव्हती. त्यावेळचे स्पेशल प्लेग ऑफिसर रँड यांच्यावर जनता विशेष जळफळत होती. पुढें १८९७ त इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरि-याला राज्यावर बसून साठ वर्षे झाली होती त्यावेळीं इंग्लंडमध्यें प्रचंड उत्सव झाला. त्याच धर्तीवर अन्यत्र ब्रिटिश साम्राज्यांतहि–उत्सव

करण्यांत आले. दीपोत्सव, मेजवान्या, दरबार, दारूकाम, मुलांना खाऊ इत्यादि कार्यक्रम ठरविण्यांत आले. पुण्यांत गव्हर्नरच्या बंगल्यावर हीरकमहोत्सवानिमित्त मेजवानी होती—त्या मेजवानीला रँड हजर होता. मेजवानी आटोपून रँड परत स्वगृहीं जात असतां सूडभावनेनें प्रेरित होऊन दामोदर चाफेकर या तरुणानें रँडवर गोळी झाडली ! रँडसाहेबांचा खून झाला — एकच कल्लोळ सर्वत्र उठला.

पुण्यांत पोलिसांचें राज्य झालें. धरपकड सुरू झाली. तालीमबाज ब्राह्मण तरुणांवर सरकारनें नजर ठेवली. यांत सरकारला जबरदस्त संशय आला तो टिळकांचा ! टिळकच या खुनाचे सूत्रधार असले पाहिजेत असा सरकारनें समज करून घेतला, पण टिळकांना पकडायला कारण सांपडेना !

### अखेर टिळकांना पकडलें !

कारणांचा शोध होऊं लागला. रँडच्या खुनाच्या निमित्तानें स्थानिक लोकांची चाललेली ससेहोलपट पाहून टिळक संतापले होते. 'सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय?' असे जळजळीत लेख ते 'केसरी' तून लिहूं लागले ! सरकारला निमित्त सांपडलें. त्यांतला एक लेख सरकारला आक्षेपार्ह वाटला व सरकारनें टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला.

टिळकांनीं बचावाची तयारी केली, खटला मुंबईलाच चालला. नऊ पंच होते. त्यांतले सहा गोरे होते, खटला खूप गाजला. कायद्याचा कीस निघाला. शेवटीं पंचांनीं 'टिळक दोषी' असा बहुमतानें निर्णय दिला. टिळकांना अठरा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली !

टिळकांना शिक्षा झाल्यावर सारा देश हळहळला. मजुरांनीं संप केले, देशभक्तांनीं अन्न वर्ज केलें. सर्वांनीं टिळकांना सहानुभूति दाखवली. दाजीसाहेब खरे हे लंडनला प्रीव्ही कौन्सिलकडे दाद मागण्यासाठीं गेले. पण कशाचाच उपयोग न होतां टिळकांना तुरुंगाची वाट धरावी लागली !

राजकीय कैदी म्हणजे त्यावेळीं सरकारचा शत्रूच! तुरुंग म्हणजे नरकवासच होता. कोरडी भाकरी व लसणीची चटणी असलें जेवण, कपडे जाडे व गलिच्छ, कोणतें म्हणून सुख नाहीं. नुसता छळ. टिळकांना तें सोसेना. त्यांचें वजन झपाट्यानें कमी होऊं लागलें. टिळक जिवंत परत येतात कीं नाहीं अशी शंका वाटूं लागली. लोकांनीं विलायतेला दाद मागितली तेव्हां त्यांना दूधभात मिळूं लागला. त्यांना येरवड्याच्या तुरुंगांत ठेवलें व रात्रीं दिवा व काम हलकें मिळूं लागलें. पुढें रँडच्या खुनास कारण झालेले चाफेकर सांपडून फांशी दिल्यावर टिळकांची मुक्तता करावा असें सरकारला वाटूं लागलें. पण टिळकांना शिक्षा संपण्यापूर्वी सोडणें सरकारला मानहानीचें वाटूं लागलें. टिळकांनीं माफी मागावी असेंहि सरकारतर्फे सुचविण्यांत आलें—पण टिळक थोडेंच ऐकणार? टिळकांना शिक्षा होऊन वर्ष झालें, पण ते सुटण्याचें दिसेना. शेवटीं सरकारनें टिळकांची सुटका केली—पण शर्ती घातल्या. पहिली शर्त अशी होती कीं, सुटकेनंतर होणाऱ्या पानसुपाऱ्यांत टिळकांनीं भाग घेऊं नये व दुसरी होती कीं, पुन्हां जर टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला तर उरलेली सहा महिन्यांची शिक्षा भोगावी! टिळकांनीं दोन्ही अटी मान्य केल्या; कारण या दोन्ही अटी त्यांच्या कर्तृत्वाला पायबंद घालूं शकत नव्हत्या!

## मुक्तीचा सोहळा

एक वर्षभर तुरुंगवास भोगून टिळक पुन्हां पुण्यांत स्वगृहीं परतले, तेव्हां रात्रीं दहाची वेळ होती. पण ही बातमी शहरांत पसरायला वेळ लागला नाहीं. जनता त्यांच्या घराकडे धांवली. फुलांचा व गुलालाचा टिळकांवर जनतेनें वर्षाव केला. उत्सव झाला तो त्या दिवशींच. अशा प्रकारें ६ सप्टेंबर १८९८ हा दिवस जनतेला दिवाळीचा वाटला!

तुरुंगांतून सुटल्यावर टिळकांनीं कांहीं काळ विश्रांति घेतली व पुन्हां कार्यारंभ केला. टिळक सुटल्यावर चाफेकर खून प्रकरणाशीं टिळकांचे

धागेदोरे होते असे प्रलाप कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रें काढूं लागलीं. त्याच-वेळीं द्रव्यलोभानें चाफेकरांना पकडून देणाऱ्या द्रवीड बंधूंचा चाफेकरांच्या धाकट्या भावानें खून केल्यामुळें आगींत तेल पडले. पण टिळक निर्दोष होते. त्यांनीं लगेच मुंबईच्या 'टाईम्स' वर व लंडनच्या 'ग्लोब' या वर्तमानपत्रांवर खटला भरला. अब्रुनुकसानीची फिर्याद दाखल केली. पुढें दोन्हीहि वर्तमानपत्रांनीं टिळकांची माफी मागितली व खर्च दिला !

याच सुमारास टिळकांनीं आपलें विश्वविख्यात 'ओरायन' पुस्तक प्रसिद्ध केलें.

## ताई महाराज प्रकरण

टिळकांच्या आयुष्यांत जीं कांहीं मोठीं प्रकरणें उद्भवलीं त्यांत ताई-महाराज प्रकरणाचा अवश्य समावेश करायला हवा. या प्रकरणानें टिळकांच्या अखेरच्या दिवसापर्यंत टिळकांना मानसिक स्वास्थ्य लाभूं दिलें नाहीं.

या प्रकरणाची सुरुवात या शतकाच्या आरंभीं झाली. बाबा महाराज नांवाच्या पुण्याच्या जहागिरदारांनीं आपलें मृत्युपत्र करून त्यांत टिळकांना इस्टेटीचे ट्रस्टी नेमले. सदर जहागिरदारांच्या पत्नी ताई-महाराज तेव्हां तरुण होत्या. पुढें महाराज मृत्यू पावले तेव्हां बाईनें दत्तक घ्यावा असें सुचविण्यांत आलें. टिळकांच्या मतें अल्पवयी दत्तक घेऊन त्याचें संगोपन करावें. ताईमहाराज त्याप्रमाणें तयार झाल्या व मुलगा निश्चित करण्यांत आला.

पण तेवढ्यांत बाईचें कान कोणी स्वार्थी लोकांनीं फुंकले व त्या तो मुलगा नाकारूं लागल्या पण टिळकांनीं त्यांची समजूत घातली व दत्त-विधान उरकलें.

पण विरोधी पक्षीयांच्या कारवाया थांबल्या नव्हत्या. त्यांनीं टिळकां-विरुद्ध सरकारकडे दाद मागितली. ताईमहाराजांची बाजू विचारांत घेऊन सर्व गोष्टींची चौकशी झाली व टिळकांना दोषी ठरवून खोटी

साक्ष दिल्याच्या आरोपावरून सरकारनें टिळकांवर खटला भरला. पहिल्या कोर्टांत टिळक दोषी ठरून त्यांना दीड वर्षांची व दुसऱ्या कोर्टांत सहा महिन्यांची शिक्षा झाली. मात्र तिसऱ्या कोर्टांत टिळक निर्दोष सुटले! सरकारनें टिळकांना कलंकित करण्याचा प्रयत्न केला, पण टिळक निष्कलंक ठरून बाहेर पडले!

खटला संपला, टिळक सुटले पण प्रकरण संपलें नव्हतें. ताईंनीं तेवढ्यांत कोल्हापूरचा एक प्रौढ मुलगा दत्तक घेतला. सरकारनें त्याला मंजुरीहि दिली तेव्हां पहिल्यांदा ज्याचें दत्तविधान झालें होतें त्याचा पक्ष घेऊन टिळकांना झगडणें प्राप्त झालें. हा झगडा सतत चौदा वर्षें कोर्टांत चालला व शेवटीं लंडनच्या उच्च न्यायमंडळानें–प्रीव्ही कौन्सिल–टिळकांसारखा निकाल दिला व पहिलें दत्तविधान कायदेशीर ठरवलें!

पण तेवढ्यावर भागलें नाहीं. कोल्हापूर संस्थानांतील बाबा महाराजांची जहागीर आपण पहिल्या दत्तकाला देणार नाहीं असें कोल्हापूरच्या महाराजांनीं जाहीर केलें. पुन्हां खटला झाला व शेवटीं टिळकांचा जय झाला. 'सत्यमेव जयते' हें पुन्हां एकदा सिद्ध झालें. टिळकांना मात्र या प्रकरणीं अतोनात मानसिक व शारीरिक त्रास झाला हें खरें!

### कॉंग्रेस

कॉंग्रेसची स्थापना झाल्यापासून टिळकांचें त्या राष्ट्रीय संस्थेकडे पूर्ण लक्ष होतें. त्या वेळीं सनदशीर मार्गानें परकीय सरकारकडून हक्क मिळवीत राहायचें कॉंग्रेसचें धोरण होतें. जहाल व मवाळ असे दोन वृत्तींचे लोक त्या वेळीं कॉंग्रेसमध्यें होते. देशांतील बहुतेक विद्वान मंडळी कॉंग्रेसमध्यें सामील झालेली होती. वंगभंगापासून टिळक व कॉंग्रेस नेते यांचे विळ्याभोपळ्याइतकेच सख्य उरलें होतें–पण टिळकांनीं कॉंग्रेस सोडली नव्हती. दादाभाई नौरोजी ह्या महापुरुषानेंहि 'स्वराज्याखेरीज तरणोपाय नाहीं' अशी भाषा काढण्यास प्रारंभ केल्यावर मवाळ नेमस्त जरा हादरले. ब्रिटिश मालावर बहिष्कार, स्वदेशी-

चा पुरस्कार व राष्ट्रीय शिक्षण ह्या गोष्टी कॉंग्रेसनें १९०५ च्या अधिवेशनांत स्वीकारल्या.

त्यानंतर १९०७ ची कॉंग्रेस नागपूरला भरणार होती ती रद्द केली. नेमस्त व जहाल यांचीं भांडणें आतां विकोपाला गेलीं. सुरत कॉंग्रेसमध्यें हें भांडण व्यासपीठावरच प्रत्यक्ष प्रगट झालें. नागपूरऐवजीं नेमस्तांनीं सुरत सुचविलें व सुरतला कॉंग्रेस भरली. नेमस्तांनीं व टिळक पक्षीय जहालांनीं खूप तयारी केली. टिळकच या कॉंग्रेसचे अध्यक्ष व्हायचे, पण रासबिहारींचें नांव नेमस्तांनीं सुचविलें व तें ठरलें. टिळकांना लजपतराय अध्यक्ष हवे होते. वादविवाद विकोपाला जाणार हें स्पष्ट दिसतच होतें.

सुरत कॉंग्रेसच्या पहिल्याच दिवशीं संग्राम सुरू झाला. जहालांनीं नेमस्त सुरेंद्रनाथांना बोलूं दिलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं पुन्हा कॉंग्रेस भरली. आपापल्या पक्षांतील लोकांना इशारा देऊनहि शिस्त राहीना. स्वागताध्यक्षांनीं अध्यक्षांची सूचना केल्यावर टिळक तहकुबीसाठीं व्यासपीठावर चढले. अध्यक्षांनीं त्यांना हरकत घेतली. वाद सुरू झाला. टिळक व्यासपीठावरून हलेनात. हुल्लडबाजी व मारामारीला ऊत आला. शेवटीं पोलिस आल्यावर शांतता झाली !

पण टिळकांची शांतता ढळली नव्हती. टिळकांचे समेटाचे प्रयत्न चालूंच होते !

**काळें पाणी**

१९०८ साल उजाडलें. दहशतवादी चळवळ बंगालमध्यें व महाराष्ट्रांत फोफावत होती. मुझफरपूरला खुदीराम बोसनें बॉंबचा प्रयोग केला नि देशभर वणवा पेटला. टिळक सरकारविरुद्ध लिहूं लागले. ‘देशाचे दुर्दैव’ व ‘दुहेरी इशारा’ या दोन्ही लेखांबद्दल सरकारनें टिळकांना दोषी ठरवलें व सहा वर्षे त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा देण्यांत आली !

खटला मुंबईस आठ दिवस चालला. टिळकांचें एकट्यांचेंच भाषण एकवीस तास चाललें होतें ! न्यायमूर्ति दावर यांनीं खटल्याचा निकाल देतांना दुष्ट शब्द वापरून टिळकांचा शाब्दिक अपमान केला व सहा वर्षे

काळ्या पाण्याची शिक्षा देऊन टिळकांना मंडाले येथें ब्रह्मदेशांत पाठ-वून दिलें !

मंडालेस असतांना टिळकांनीं आपला विख्यात 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. १९१४ मध्यें सहा वर्षांची प्रदीर्घ शिक्षा भोगून टिळक पुन्हा पुण्यांत आले.

१९१५ मध्यें टिळक परत आल्यावर स्वराज्यप्राप्तीसाठीं होमरूल लीगची स्थापना करण्यांत आली. त्यांत ॲनी बेझंट या बाईचें विशेष अंग होतें. त्यासाठीं टिळकांनीं तुफानी प्रचार केला. इतका कीं, सरकारला त्यांत लक्ष घालावें लागलें. होमरूल मागणें हा राजद्रोह ठरविण्याचा सरकारनें बेत केला, पण शहा नांवाच्या निःस्पृह न्यायाधीशांनीं सरकार-चा तो बेत उधळून लावला.

१९१६ त टिळकांचा साठावा वाढदिवस जनतेनें उत्साहानें साजरा केला. व त्यांना लाख रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली. या सत्कार समारंभावरहि भाषणांबद्दल जामीन मागून सरकारनें विरजण पाडण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला.

१९१८ मध्यें 'चिरोलचें' प्रकरण उद्‌भवलें. त्यांत टिळकांनीं लंडनपर्यंत प्रवास केला पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. खटल्यांतहि टिळकांना फार त्रास सोसावा लागला.

आतां इहलोकांतलें टिळकांचें वास्तव्य संपत आलें होतें. सबंध आयुष्यभर देशाच्या स्वातंत्र्यासाठीं टिळक अहर्निश झगडत होते. मधुमेहानें शरीर पोखरले असतांनाहि टिळक काळ्या पाण्याची शिक्षा भोगून आले. ताईमहाराजांच्या खटल्यासाठीं १९२० च्या जुलैंत टिळक मुंबईस गेले ते परत आलेच नाहींत ! फिरायला जायचें निमित्त होऊन त्यांना ताप भरला तो शेवटचाच ! अखेर ३१ जुलै १९२० रोजीं रात्री साडेबारा वाजतां सर्व उपाय हरले आणि टिळक निधन पावले ! भारताचा मुकुटमणि हरपला !

जवाहरलाल नेहरू



शांतिदूत

पहाता पहाता त्या दोन गिर्रेबाज कबुतरांनीं आकाशांत झेंप घेतली. ज्या व्यक्तीनें तीं स्वहस्तें सोडलीं होतीं ती व्यक्ति तर त्या कबुतरांकडे पाहात होतीच पण लाल किल्ल्यावर झेंडावंदनासाठीं जमलेला अफाट

जनसमुदायहि त्या कबुतरांकडे पहात होता; आणि मनांत म्हणत होता, 'जा, जा कबुतरांनो, दूर जा. चारी दिशांना जा नि भारताच्या शांतिदूतानें सांगितलेला संदेश जगभर पोंचवा!'

ही कबुतरें सोडणारी व्यक्ति म्हणजे आपले भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू. प्रसंग स्वातंत्र्यदिनाचा, पंधरा ऑगस्टचा. दरवर्षीं स्वातंत्र्यदिनीं पंडितजी अशीं कबुतरें सोडतात आणि जगाला शांतीचा संदेश देतात. जगांत पंडित नेहरूंची लोकप्रियता अतुलनीय आहे. आज शांततेचे खरे एकमेव पुरस्कर्ते पंडितजीच केवळ आहेत. मुखानें शांतीचे मंत्र म्हणत परराष्ट्रांत छत्रीधारी सेना उतरविण्याची पंडितजींची नीति नाहीं किंवा आकाशांत कबुतरें सोडीत शेजारच्या छोट्या राष्ट्रावर सशस्त्र सैन्य सोडण्याची रीतीहि नाहीं. ते खरे शांततेचे पूजक आहेत, हें म्हटलें जातें तें एवढ्याकरतांच.

### प्रतापी पिता

पंडितजींचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं उत्तर प्रदेशांतील अलाहाबाद या विख्यात शहरीं झाला. भारतीय संस्कृतीचे प्रयाग हें क्षेत्र म्हणजेच अलाहाबाद. या ठिकाणींच पंडितजींचा जन्म झाला. पंडितजीचे पिताजी पं. मोतीलाल नेहरू म्हणजे अलाहाबादेंतील एक नामांकित वकील होते. लक्ष्मी, सरस्वती अक्षरशः त्यांच्याकडे पाणी भरत होत्या. एखाद्या संस्थानिकाचा नसेल असा मोतीलालजींचा थाट होता. सौजन्य, चातुर्य, स्वाभिमान या गुणांबरोबरच अत्यंत मोहक व्यक्तित्वाची त्यांना देणगी लाभली होती. ते इतके कर्तव्यकठोर होते कीं, गोरे अधिकारीहि त्यांच्यापुढें नमून असत. अशा पराक्रमी आणि प्रतापी पित्याचा पुत्र होण्याचें भाग्य पंडितजींना लाभले. पंडितजींची आई स्वरूपराणी ह्या नांवाप्रमाणेंच अक्षरशः सौंदर्यसम्राज्ञी होत्या. मूळ काश्मीरी असलेले हें नेहरू दांपत्य म्हणजे अलाहाबादचे भूषण होते.

### इंग्लंडमध्यें शिक्षण

इतकी अनुकूल परिस्थिति असल्यावर कशालाच कमी नव्हतें. लहानपणापासून आनंदभवनाच्या राजशाही आवारांत पंडितजी वावरले. आनंदभवन म्हणजे अलाहाबादेंत उभारलेला सुखमंचक होता.

१९०५ सालीं वयाच्या पंधराव्या वर्षीं पंडितजी शिक्षणासाठीं इंग्लंडला गेले. तेथें हॅरोच्या शाळेंत प्रथम आणि नंतर केंब्रिज विद्यापीठांत त्यांचें शिक्षण झालें. एम्. ए. ही पदवी आणि बॅरिस्टरची पदवी संपादन करून १९१२ मध्यें पंडितजी भारतांत परतले.

सात वर्षांनंतर स्वदेशी परतलेल्या सुपुत्राचें आनंदभवनांत स्वागत झालें. या वेळींच पंडितजींनीं आपली सर्वांत छोटी बहीण कृष्णा ही प्रथम पाहिली. कृष्णा ही तेव्हां पांच वर्षांची होती. पंडितजींच्या पाठची बहीण म्हणजे स्वरुप ऊर्फ आजच्या विजयालक्ष्मी पंडित. भारताच्या ब्रिटनमधील वकील. आजची कृष्णा हाथीसिंग हीच ती कृष्णा.

### विवाह

स्वदेशीं परतल्यानंतर १९१६ सालीं कमला कौल या सुस्वरूप तरुणीशीं पंडितजींचा विवाह झाला. कमला खरोखरच नेहरू घराण्याच्या परंपरेला शोभेल अशी सौन्दर्यवती शालिनी होती. पंडितजींच्या वाढदिवशीं देखील ज्या आनंदभवनाला महोत्सवाचें स्वरूप येई त्या आनंदभवनाला पंडितजींचें लग्न म्हणजे सोहळ्यांचा राजाच होता. दिल्लीला दरबारी थाटानें दहा दिवस पंडितजींचा विवाहोत्सव सुरू होता. आणि त्यानंतर अलाहाबादेंत.

### नेतृत्वाचा प्रारंभ

पंडितजींनीं नेतृत्वाचे पहिले धडे घेतले ते शेतकऱ्यांजवळ. जमीन मालकांनीं शेतकऱ्यांची पिळवणूक चालविली होती. कर्जाचे बोजे त्यांच्या माथ्यावर ठेवले जात होते आणि छळाची तर सीमाच नव्हती. प्रासादाच्या सीमेंत वावरणाऱ्या राजपुत्रतुल्य पंडितजींच्या कानावर त्यांच्या किंकाळ्या

गेल्या. पायघड्या सोडून पंडितजी त्यांच्या पर्णकुटीकडे धांवले. त्यांचें नेतृत्व त्यांनीं पत्करलें. रायबरेलीला शेतकऱ्यांवर अमानुष गोळीबार केला गेला तो १९२१ सालींच.

याच सुमारास असहकारितेचा ध्वज घेऊन गांधीजींनीं बंड पुकारलें होतें. ब्रिटिश सरकारच्या जुलमी कायद्यांना जनता जबरदस्त विरोध करीत होती. तिनें इंग्लंडच्या युवराजाचीहि कदर केली नाहीं त्यालाहि काळीं निशाणें दाखविलीं. नेहरू पितापुत्र जनतेच्या बाजूनें उभे राहिले.

## पहिला बंदिवास

आणि याचा परिणाम व्हायचा तोच झाला. दोघांनाहि अटक करण्यांत आली. आनंदभवनांतील कुटुंबियांनीं सुहास्य मुद्रेनें निरोप दिला. दोघांनाहि प्रत्येकीं सहा महिन्यांची कैद व पांचशें रुपये दंड अशी शिक्षा झाली. दंडवसुलीसाठीं आनंदभवनांतील कित्येक बहुमोल वस्तु पोलिसांनीं जप्त केल्या.

पंडितजींचा हा पहिला तुरुंगवास, लखनौच्या तुरुंगांत तेव्हां दोघांनाहि ठेवण्यांत आलें होतें. पंडितजींना ह्या तुरुंगवासाचा अनुभव फारसा चांगला आला नाहीं. त्या कोठडींत आपली दिनचर्या त्यांनीं कशीबशी पार पाडली—नि ६ महिन्याऐवजीं ३ महिन्यांनींच त्यांची मुक्तता झाली.

या तुरुंगवासाच्या पाठोपाठ आक्टोबरमध्यें परदेशीं कापडाच्या दुकानावर निरोधन केल्याच्या आरोपावरून पुन्हां पंडितजींना पकडण्यांत आलें आणि त्यांना एकवीस महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा देण्यांत आली; पण याहि खेपेस ते तीन महिन्यांतच सुटले !

## संस्थानी तुरुंग

१९२३ सालीं नाभा संस्थानांतील शीखांच्या उत्सवाला गोऱ्या अधिकाऱ्यानें बंदी केली तेव्हां पंडितजी शीखांच्या बाजूनें उभे राहिले.

पंडितजींनीं बंदीहुकूम मोडला. संस्थानी तुरुंगवास म्हणजे नरकवासच. पंडितजींना त्याचा पुरा प्रत्यय केवळ पंधरवड्यांत आला.

### गांधीजींचें पहिलें दर्शन

१९१६ च्या लखनौ काँग्रेसमध्यें पंडितजींनीं गांधीजींना प्रथम पाहिलें. शिष्याला गुरुचें पहिलें दर्शन झालें तें इथेंच. गांधीजी नि पंडितजी यांच्या विशाल स्नेहसरितेचें लखनौ हेंच उगमस्थान. मंडाले येथील काळ्या पाण्याची शिक्षा भोगून लोकमान्य टिळक या काँग्रेसला प्रथमच हजर राहिले. पंडितजींना लोकमान्यांबद्दल विलक्षण आदर वाटे. लोकमान्यांनीं काढलेल्या होमरूल लीगचे पंडितजी सदस्य झाले व देशासाठीं दुप्पट उत्हासानें काम करूं लागले.

पण सत्याग्रहांत भाग घेऊन तुरुंगांत जाण्याची मोतीलालजी पंडितजींना परवानगी देईनात. खुद्द गांधीजींनींहि पंडितजींना महाप्रयासानें थोपवून धरलें. पण पंडितजी थांबले नव्हते. १९२३ सालीं ते काँग्रेसचे मुख्य चिटणीस झाले. जालियनवाला बागेंतील अत्याचाराची चौकशी करण्यासाठीं काँग्रेसनें नेमलेल्या समितीचे मदतनीस म्हणून पंडितजी काम करूं लागले.

### स्वातंत्र्य युद्ध

काँग्रेसनें जहाल व्हावें. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं तुफानी चळवळ करावी व ब्रिटिश सरकार नेस्तनाबूद करावें अशा प्रवृत्तीची जी तरूण मंडळी काँग्रेसमध्यें होती त्यांत पंडितजी आणि सुभाषबाबू अग्रसर होते. त्यांनीं स्वातंत्र्याचें रणशिंग फुंकण्यासाठीं 'भारतीय स्वातंत्र्य संघ' स्थापन केला. तुफानी प्रचार सुरू केला.

तेवढ्यांत इंग्लंडमधून सायमन कमिशन आलें. 'मॉटफोर्ड' सुधारणांची पहाणी करण्यासाठीं हें कमिशन भारतांत यावयास निघालें. पण या कमिशनमध्यें एकहि हिंदी माणूस नव्हता! सातहि गोरे होते!

झाले. या कमिशनवर बहिष्कार घालण्याचें स्वातंत्र्यप्रेमी जनतेनें

ठरवलें. जेथें जेथें हें कमिशन जाईल तेथें तेथें काळ्या निशाणांनीं त्यांचे स्वागत करायचें हें ठरून गेलें ! लाहोरला कमिशनचा निषेध करण्यासाठीं शीख उभे राहिले. लाला लजपतराय हे वृद्ध देशभक्त त्यांचे नेते झाले.

पण सरकारनें तें पाहिलें नाहीं. निषेधासाठीं निघालेल्या मिरवणुकीवर सरकारनें लाठीधारी शिपाई सोडले. त्यांनीं लाला लजपतरायसारख्या वृद्ध देशभक्तावराहि लाठी चालवली.

आणि कांहीं दिवसातच या लाठीमाराचें निमित्त होऊन लजपतरायजी स्वर्गस्थ झाले. देशाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

लखनौलाहि निषेधाच्या मिरवणुकीवर लाठीहल्ला झाला. पंडिजींच्या पाठीवर लाठीचे दोन तडाखे बसले. पण पंडितजी आपल्या जागेवरून हलले नाहींत ! विरोधाला भ्याले नाहींत, हल्ल्याला डरले नाहींत. एखाद्या पर्वतासारखे ते धैर्यशाली पंडितजी उभे राहिले !

## तरुण राष्ट्राध्यक्ष

पंडितजींच्या देशसेवेचें फळ त्यांना लौकरच मिळालें. कोणत्याहि पारितोषिकाची अपेक्षा न करतां सतत देशसेवा करणाऱ्या या महापुरुषाला त्याच्या देशसेवेचें बक्षिस दिलें पाहिजे असें जनतेनें ठरवलें आणि १९२९ च्या लाहोर कॉंग्रेसचें अध्यक्षपद पंडितजींना देण्यांत आलें.

पंडितजींची लाहोर कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून जेव्हां निवड झाली तेव्हां त्यांना नुकतेच एकेचाळीसावें वर्ष लागलें होतें. आजपर्यंत पन्नाशी साठी उलटलेल्या वृद्ध अनुभवी देशभक्तांनाच कॉंग्रेसचें अध्यक्षाचें सिंहासन लाभलें होतें. पंडितजींची तर जेमतेम चाळीशी उलटली होती. पण त्यांची देशसेवा ? ती अतुलनीय होती, अलौकिक होती. खुद्द मोतीलालजी कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले ते १९२८ सालीं, त्यांच्या वयाच्या ६८ व्या वर्षी ! त्या मानानें विचार केला तर पंडितजी खरोखरच 'अल्प' वयांत कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले असें म्हणावयास हवें !

## रावी नदीच्या तीरावर

रावी नदीच्या तीरावर लजपतरायनगरमध्यें पंडितजींच्या अध्यक्षतेखालीं लाहोर कॉंग्रेस सुरू झाली. लाहोर कॉंग्रेसच्या वेळीं सारा देश राष्ट्रभक्तीनें पेटून गेला होता. लाहोर क्रांतिकारकांचा नि मीरतच्या मजूर पुढाऱ्यांचा खटला चालू होता. मुम्बई, कलकत्ता येथें सार्वत्रिक संप चालले होते. भगतसिंगांनीं दिल्लीच्या विधिमंडळांत बॉम्ब फेंकला होता. तुरुंगांत ठेवलेले राजबंदी अन्नसत्याग्रह करीत होते आणि कॉंग्रेसनें स्वराज्यासाठीं सरकारला दिलेली वर्षाची मुदत संपली होती. सारा देश पंडितजींकडे आशेनें, अपेक्षेनें पहात होता.

लाहोर कॉंग्रेसनें पंडितजींच्या अध्यक्षतेखालीं संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर केला. एक पाऊल पुढें टाकलें. देशभर एकच उत्साहाची लाट पसरली.

## गोलमेज परिषद

लखनौ कॉंग्रेसनंतर तीनच महिन्यांच्या आंत १२ मार्च १९३० रोजीं गांधीजींनीं दांडीयात्रा सुरू केली. कायदेभंगाच्या विराट चळवळीनें विराट देश व्यापून गेला. ब्रिटिशांनीं लंडनला गोलमेज परिषद भरविली. गांधीजी लंडनला जाऊन आले. कायदेभंगाच्या चळवळींत लाखों देशभक्त बंदिवासी झाले होते. 'गांधी आयर्विन' करारान्वयें त्यांची मुक्तता करण्यांत आली. आयर्विन हे तेव्हां व्हाईसरॉय होते.

पण लंडनची शिष्टाई नि दिल्लीचा करार दोन्ही निष्फळ ठरले. गांधीजींनीं पुन्हां चळवळीचें शिंग फुंकलें.—पंडितजींना अटक झाली. दीडवर्ष चार भिंतीआड त्यांना बद्ध करून ठेवण्यांत आलें.

## मोतीलाल गेले

मध्यंतरीच्या काळांत पंडितजींवर एक दुःखद प्रसंग ओढवला आणि तो म्हणजे त्यांचे पिताजी मोतीलालजी यांचें निधन. पंडितजींचे मोतीलालजींवर अपूर्व प्रेम आणि तसेंच त्यांचेंहि. नेहरू पितापुत्र म्हणजे

काँग्रेसचें भूषण झालें होतें. त्यांतला एक तारा निखळला. मोतीलालजी गेले. हा धक्का पंडितजींच्या सहनशक्तीपलीकडचा होता. ६ फेब्रुवारी १९३१ रोजीं मोतीलालजी गेले. लखनौ काँग्रेसच्या मंडपाला त्यांचेच नांव दिलें गेलें. त्यांची स्मृति काँग्रेसनें जगविली. १९३६ साल उजाडलें पंडितजींच्या राजकीय आयुष्यांत हें फार महत्त्वाचें वर्ष. या एकाच वर्षांत पंडितजी दोनदा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. पण त्यापूर्वीं त्यांना आणखी एक धक्का सहन करावा लागला आणि तो म्हणजे प्रिय पत्नीचा चिरवियोग.

## कमला

१९१६ सालीं इंग्लंडहून परतल्यावर पंडितजींचा कमलाशीं विवाह झाला होता. तेव्हांपासूनची वीस वर्षांची सोबत सोडून कमला निघून गेली. तिनें पंडितजींना स्वातंत्र्ययुद्धांत तनमनेंकरून साथ दिली. प्रकृति अत्यंत नाजुक असतानाहि तीव्र उष्णतेंत वा थंडींत तिनें देशाची सेवा केली. तुरुंगाची हवाहि तिनें खाल्ली. अशी ही अलौकिक स्त्री गेली. पंडितजींच्या आयुष्यांतला एक मोठा आधार गेला. ४ सप्टेंबर १९३५ रोजीं कमला नेहरूंची प्रकृति अचानक बिघडली म्हणून आल्मोड्याच्या बंदिवासातून पंडितजींची मुक्तता करण्यांत आली. कमला त्यावेळीं स्वित्झर्लंडमधील रुग्णालयांत होत्या. तांतडीनें पंडितजी स्वित्सर्लंडला विमानानें रवाना झाले.

पंडितजी स्वित्झर्लंडला पोंचले तेव्हां कमलाची प्रकृति खूपच बिघडलेली होती. पंडितजींच्या आगमनानें ती थोडीशी सुधारल्यासारखी वाटली पण क्षणभरच. विझतांना दिवा मोठा होतो, तशी ती सुधारणा. पंडितजी त्यांना वाचून दाखवीत. त्यांच्याशीं बोलत रहात पण अल्पशा संभाषणानेंहि त्यांची प्रकृति अस्वस्थ होई. तें बोलणें कमलाला सहन होत नसे. प्रकृति सुधारली असं वाटलं खरं; पण सुधारली नाहींच. अखेर पंडितजी जवळ असताना २८ फेब्रुवारी १९३६ रोजीं कमलानें

प्राण सोडला. पत्नीचा वियोग हा पंडितजींच्या जीवनावरचा एक अमानुष आघात होता.

## पुन्हा देशसेवेस सिद्ध

स्वित्झर्लंडहून पंडितजी विषण्ण मनानें परतले खरे, पण स्वतःच्या दुःखांत चूर व्हायला देखील त्यांना सवड नव्हती. १९३६ या एका वर्षांतच दोनदा त्यांना कॉंग्रेसचे अध्यक्षपद घ्यावें लागलें. एप्रिलमध्यें लखनौला आणि डिसेंबरमध्यें फैजपूरला महाराष्ट्रांत. लखनौला मोतीनगर आणि फैजपूरला टिळकनगर अशीं मंडपांना नांवें दिलीं होतीं. पंडितजींना पूज्य असणारीं दोन नांवें.

## तुफानी प्रचार दौरा

कॉंग्रेसनें निवडणुकीचें राजकारण करायचें ठरवल्यावर प्रचाराची कामगिरी अर्थातच कॉंग्रेसाध्यक्ष पंडितजींवर येऊन पडली. इतर असंख्य प्रचारक होतेच पण चंद्राशिवाय आकाशाला काय शोभा आहे? शत-तारका असल्यातरी चंद्राची उणीव भासणारच, पंडितजी प्रचारार्थ निघाले. अटकेपासून कटकपर्यंत, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हा वीर प्रचारार्थ बाहेर पडला. हजारों सभा घेतल्या, शेंकडों पृष्ठें भरतील इतकीं भाषणें केलीं. कॉंग्रेसच्या प्रचारानें देश दणाणून सोडला.

## मध्यंतरींची हकिगत

१९३६ नंतर कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें आलीं. सात प्रांतांत कॉंग्रेसनें बहुमत मिळवलें. पण हीं मंत्रिमंडळें अल्पजीवी ठरलीं. युद्धाच्या नौबती वाजूं लागतांच कॉंग्रेस सत्ता सोडून बाहेर पडली. युरोपांत युद्धाच्या ज्वाला भडकूं लागल्या. इकडे जपान भारताच्या उंबरठ्याशीं आला. वैयक्तिक सत्याग्रहाच्या पाठोपाठ देशानें कॉंग्रेसजवळ लढा मागितला. क्रिप्स योजना फेटाळली गेली. देशाच्या स्वातंत्र्य संपादनार्थ सुभाषचन्द्र भूमिगत झाले.

## चले जाव

आणि ९ ऑगस्ट १९४२ रोजीं गांधीजींनीं चलेजावची भीमगर्जना केली. ब्रिटिशांना विरोध करण्यास सारा देश उभा राहिला. गोळ्यांचा देशभक्तांवर पाऊस पडला. काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते बंदिवासांत फेंकले गेले. गांधीजी आगाखान प्रासादांत पुण्याला आणि राजेंद्रप्रसाद उत्तर प्रदेशांत बांकीपूर तुरुंगांत, एवढे दोन अपवाद सोडले तर काँग्रेसचे सर्व प्रमुख नेते अहमदनगर येथील किल्ल्यांत बंदिस्त करण्यांत आले होते त्यांत पंडितजीहि होते.

## ग्रंथकार पंडितजी

या अहमदनगरच्याच बंदिशाळेंत पंडितजींनीं आपला भारताचा शोध ( डिसकव्हरी ऑफ इंडिया ) हा ग्रंथ लिहिला. पंडितजींनीं त्यानंतर ग्रंथलेखन केलेंच नाहीं. वास्तविक पंडितजींचा पिंड लेखकाचा पण त्यांना लेखनाला सवडच मिळूं नये एवढें देशाचें काम त्यांना करावें लागलें. पंडितजींनीं केलेलें बहुतेक लेखन बंदिवासांतलें आहे. नऊ वेळां पंडितजी तुरुंगांत गेले. साडेसहा वर्षें त्यांनीं तुरुंगवासांत घालवली. आपलें आत्मचरित्र आणि ‘जगाच्या इतिहासाचें ओझरतें दर्शन’ हें ग्रंथहि त्यांनीं बंदिशाळेंतच लिहिलें. पण पंडितजींची लेखणी अशी कर्तबगार कीं या तीन ग्रंथांतच तिनें त्यांना श्रेष्ठ लेखकांच्या रांगेंत नेऊन बसवलें.

## युरोप व आशिया

बेचाळीसच्या तुरुंगवासापूर्वी १९३७ ते १९३९ या दोन वर्षांत पंडितजी युरोपांत जाऊन आले तेथील परिस्थितीची त्यांनीं पाहणी केली, युरोपप्रमाणें आशियांतील चीन, सिलोन, ब्रह्मदेश, मलाया या देशांनाहि पंडितजींनी भेटी दिल्या व नव्या अनुभवाचें गांठोडें बांधून तें पुन्हा देशसेवेसाठीं स्वदेशीं परतले.

### मुक्तता

१९४५ साल उजाडलें. युद्धाच्या ठिणग्या विझूं लागल्या. बेचाळीसचे निखारेहि कोळपूं लागले. सरकारनें गांधीजींची मुक्तता केली आणि त्यापाठोपाठ इतर काँग्रेस नेत्यांचीहि.

### प्रधानकी

सुटका झाल्यावर वाटाघाटींचें पूर्व सुरू झालें. सिमलापरिषद, त्रिमंत्रि योजना, माऊंटबॅटन योजना अशा स्वातंत्र्याच्या योजना पुढें येऊं लागल्या. सिमला परिषद फिसकटली. त्रिमंत्री योजनेला काँग्रेसनें मान्यता दिली पण मुस्लीमलीग देईना, कारण त्रिमंत्रियोजनेनें पाकिस्तान अशक्य नि अव्यवहार्य ठरविलें होतें. घटना परिषद मुस्लीम लीगला साफ नामंजूर होती. पंडितजींच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या हंगामी सरकारला तिनें प्रथम सहकार्य नाकारलें. पण पुढें थोडे मार्ग बदलून लीग हंगामी सरकारांत सामील झाली. लियाकतअली अर्थमंत्री झाले, पण पंतप्रधान नेहरूच राहिले !

### स्वतंत्र भारत

१५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारताचें भारत नि पाकिस्तान अशा दोन देशांत विभाजन केल्याचें तेव्हांचे व्हाईसरॉय माऊंटबॅटन यांनीं जाहीर केलें, आणि दिल्लीवर तिरंगी झेंडा फडफडूं लागला. पंडितजी मुख्यमंत्री नि परराष्ट्रमंत्री झाले. वल्लभभाई गृहमंत्री, नि उपपंतप्रधान झाले. स्वातंत्र्याच्या जाणिवेनें देश अन्तर्बाह्य पुलकित होऊन गेला. पंडितजींच्या जयजयकाराचे बोल दाही दिशांतून उमटले, स्वतंत्र भारताचा पहिला पंतप्रधान होण्याचें महत्‌भाग्य पंडितजींना लाभलें.

### स्वातंत्र्य हें साधन !

पण देशाचें स्वातंत्र्य हेंच पंडितजींचें अखेरचें ध्येय नव्हतें. स्वातंत्र्य हा शेवटचा टप्पा त्यांनीं कधींच मानला नाहीं. उलट ध्येयसाधनेंतलें महत्त्वाचें पाऊल एवढीच त्यांची स्वातंत्र्याकडे पहाण्याची दृष्टि होती.

सुजलाम् सुफलाम् भरतभूमि करावयाची होती आणि शिवाय जगांतल्या श्रेष्ठ राष्ट्रांत गणना व्हायला हवी होती.

### संकटेंच हरलीं !

पंडितजी पंतप्रधान झाले तेव्हां त्यांच्यापुढें अनेक समस्या होत्या. पहिली समस्या निर्वासितांची. मुस्लीम लीगच्या प्रत्यक्ष प्रतिकारामुळें लक्षावधि हिंदु निर्वासित झाले होते. त्यांची पुनर्वसाहत करावयाची होती. नवस्वातंत्र्याचे काळजीपूर्वक संगोपन करावयाचें होतें. त्यांतच गांधीजींच्या खुनामुळें उद्‌भवलेल्या अनेक संकटांना तोंड द्यायचें होतें. पंडितजींसारखा कर्णधार होता म्हणूनच ते देश सांवरूं शकले एवढे सांगितलें म्हणजे त्यांच्या कार्याची कल्पना येईल.

### नवभारताची वाटचाल

२६ जानेवारी १९५० रोजीं डॉ. राजेंद्रप्रसादांच्या अध्यक्षतेखालीं घटना समितीनें स्वतंत्र भारताची घटना मंजूर करून घेतली. भारत सार्वभौम नि लोकसत्ताक झाला. राजेंद्रप्रसादजी भारताचे पहिले राष्ट्रपति झाले. पहिली पंचवार्षिक योजना संपवून दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली. राज्यपुनर्रचनेचा बिकट प्रश्न सोडविण्यांत पंडितजींनीं बरेचसें यश मिळविलें आणि देश उत्साहानें प्रगतीची वाट आक्रमूं लागला. पंडितजींच्या तटस्थतेच्या परराष्ट्रीय धोरणामुळें जगाचें भारतानें लक्ष वेधून घेतलें. आशियाई राष्ट्रांचा पुढारी म्हणून भारतानें जगांत मान्यता मिळविली. कोलंबो राष्ट्रांतर्फे बांडुंगला आशियाई नि आफ्रिकेंतील राष्ट्रांची परिषद् भरवून यशस्वी करण्याची बिकट कामगिरी पंडितजींच्या नेतृत्वाखालीं भारतानेंच पार पाडली. कोरिया, व्हिएटनाम, किंवा इजिप्त या ठिकाणीं भडकलेल्या युद्धाच्या ज्वाला विझविण्याचें महत्त्वाचें कार्य करण्यांतहि भारतानें पुढाकार घेतला.

### पंचशील

भारताच्या शांततामय परराष्ट्रीय धोरणाची जी पंचसूत्री तिचा

पंडितजी सतत प्रचार करतात. तिलाच पंचशील असें नांव आहे. परस्परांच्या सार्वभौमत्वाला मान्यता, प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा नि स्वायत्ततेचा पुरस्कार, अनाक्रमण, अन्तर्गत कारभारांत हस्तक्षेपाला विरोध आणि शांततापूर्ण सहजीवन या पांच तत्त्वांनाच पंचशील असें संबोधिण्यांत येते. गेल्या पांच वर्षांत पंडितजी जेथें जेथें गेले तेथें तेथें व जे जे परराष्ट्र नेते या देशांत आले त्यांनीं या तत्त्वांचा आनंदानें पुरस्कार केला आहे. त्यांत रशियासारखी बालिष्ठ राष्ट्रें तर आहेतच पण इजिप्तपासून इंडोनेशिया सारखी इतर सर्व राष्ट्रेंहि आहेत.

## शांततेचा प्रचार

शांततेच्या प्रचारार्थ आजपर्यंत पंडितजी निरनिराळ्या देशांत जाऊन आले. १९४९ मध्यें अमेरिकेंत, १९५४ मध्यें लालचीनमध्यें, १९५५ त रशिया नि इजिप्तमध्यें, १९५६ मध्यें सौदी अरेबिया व अमेरिकेंत पंडितजी जाऊन आले. वर उल्लेखिलेल्या सर्व राष्ट्रांनीं पंडितजींचें आपल्या देशांत उत्साहानें व सहर्ष स्वागत केलें. राष्ट्रकुलांतील पंतप्रधानांच्या बैठकीसाठींहि पंडितजी चारदा लंडनला जाऊन आले. १९६० मध्यें केनेडीनें अमेरिकेची अध्यक्षपदाची सूत्रें हातीं घेतल्यावर त्यांनीं पंडितजींना निमंत्रण केलें. आणि पंडितजी अमेरिकेला जाऊन आले. जागतिक शांततेच्या थोर पुरस्कर्त्यांची अशी मैत्री जमत असतांनाच नोव्हेंबर १९६२ मध्यें लाल चीननें भारतावर विश्वासघात करून आक्रमण केलें. पंडितजी या आक्रमणानं किंचित् हादरले, पण क्षणकालच. या आक्रमणाला विरोध करण्यासाठीं संबंध देश त्यांच्या पाठीमागें तत्काळ उभा राहिला. सुदैवानें भारताची अमेरिकेसारखी मित्रराष्ट्रें मदतीस धांवली आणि चीननें माघार घेतली.

## अखेर

पण याचा नेहरूंच्या मनावर आणि प्रकृतीवर बहुधा परिणाम झाला आणि त्यांची प्रकृति खालावत गेली. भुवनेश्वरच्या कॉंग्रेस बैठकींत

१९६४ च्या जानेवारात त्यांना अर्धांगाचा झटका आला. त्यांतूनहि ते बरे झाल्यासारखे वाटले तोंच निर्घृण काळानें २७ मे १९६४ रोजीं दुपारीं अचानक झडप घालून या थोर पुरुषाला नेले आणि भारताचे कधींहि भरून न येणारे नुकसान झालें.

◆ ◆ ◆

# विजयालक्ष्मी पंडित



## नेहरू घराणें

एखाद्या कमळाच्या सर्व पाकळ्या अतिशय सुबक, सुरेख, सुगंधी असतात. नेहरू घराणें हें असेंच कमल पुष्पासारखें आहे. या घराण्यां-तील सर्वच व्यक्ति वैशिष्ट्यपूर्ण आहेत. प्रत्येकानें देशसेवेंत अहमह-

मिकेनें भाग घेतला आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कारावास पत्करला आहे. कोणीहि असो, मग ते वयोवृद्ध पंडित मोतीलालजी असोत अथवा घरांतली छोटी कृष्णा असो, देशसेवेंत कोणी मागें नाहीं. जवाहरलालजी स्वत: हे तर नेहरू घराण्याचें प्रतीक आहेत. माळेंतले मेरुमणी आहेत. मोतीलालजींनीं आयुष्याच्या उत्तरार्धांत देशासाठीं कष्ट सोसले, त्यांत त्यांच्या पत्नीहि होत्या. जवाहरलालजींचें बरेंचसें आयुष्य तर तुरुंगाच्या भिंतीआडच गेलें. जवाहरलालजींच्या पत्नी कमला नेहरू व स्वरूप आणि कृष्णा यांनाहि तुरुंगाचा प्रसाद मिळाला. कोणीहि त्यागाच्या शर्यतींत मागें राहिलें नाहीं. त्यामुळें नेहरू घराणें हें आपल्या देशाचें भूषण झालें आहे यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे ?

## स्वरूप नेहरू

त्या वेळची स्वरूप नेहरू म्हणजे आजच्या विजयालक्ष्मी पंडित होत. जगांतल्या अत्यंत बुद्धिमान्, मुत्सद्दी आणि श्रेष्ठ श्रेणीला जाऊन पोंचलेल्या जगांत ज्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया आहेत त्यांत विजयालक्ष्मींची गणना होते. विधिमंडळाच्या सदस्य, मंत्री, परदेशांत वकील आणि सर्वांत मोठा मान म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्वसाधारणसभेचे अध्यक्षपद. सर्व सन्माननीय पदें भूषविणाऱ्या विजयालक्ष्मी या जगांतील एकमेव महिला आहेत. या अर्थानें पाहिलें तर त्यांना जगांतली अद्वितीय स्त्रीच म्हणावें लागेल.

## दुसरें अपत्य

स्वरूप नेहरू किंवा आजच्या विजयालक्ष्मी पंडित यांचे वडील पं. मोतीलाल नेहरू त्या वेळीं अलाहाबादच्या वरिष्ठ न्यायालयांत वकिली करीत असत. त्यांचे पहिले चिरंजीव म्हणजे जवाहरलाल. आजचे भारताचे पंतप्रधान. जवाहरलालनंतर १८ ऑगस्ट १९०० या दिवशीं मोतीलालजींना दुसरें अपत्य झालें. पुढें त्रिखंडकीर्ति मिळविणाऱ्या भावाची ही बहीणहि त्रिखंडकीर्ति मिळवील असें त्या वेळीं कोणी

सांगितलें असतें तर तें खोटें वाटलें असतें. त्या काळांत स्त्रीचें स्थान केवळ घराच्या उंबरठ्याच्या आंत होतें, तिनं आपलं सर्व जीवन चूल नि मूल यांच्या उस्तवारींतच व्यतीत करावं असा तेव्हां अलिखित नियम होता. या काळांत विजयालक्ष्मींचा जन्म झाल्यानं तसं भविष्य कोणीं वर्तविलं असतं तर तो वेडा खास ठरला असता !

### शिक्षण

विजयालक्ष्मींचें बहुतेक शिक्षण खाजगी शिक्षकाजवळ झालें. १९०५ सालीं वयाच्या पांचव्या वर्षींच त्यांना युरोपची पहिली यात्रा घडली.

### इंग्लंडकडे

१९०५ सालीं जवाहरलाल यांना इंग्लंडला शिक्षणासाठीं पाठविण्याचें ठरलें पण जवाहरलालजींचें वय होतें अवघे सोळा वर्षांचें ! मग आपल्या जवाहरलालना इंग्लंडला पोंचविण्यासाठीं सारं नेहरू कुटुंबच निघाले. मोतीलालजी निघाले, जवाहरलालजी तर होतेच पण त्यांची आई नि पांच वर्षांची छोटी विजयालक्ष्मीहि !

### हूपर बाई

विजयालक्ष्मींचं बहुतेक सारं शिक्षण घरींच झालं. रवींद्रनाथांप्रमाणें त्याहि कधीं शाळा कॉलेजांत गेल्या नाहींत. पूर्वी स्त्रियांनीं शाळा-कॉलेजांत जाऊन शिक्षण घेण्याची पद्धत नव्हती. पण विजयालक्ष्मीं-सारख्या धनिक कन्येला तें भारतांत किंवा परदेशांत शक्य झालं असतं. तरीपण विजयालक्ष्मींचं शिक्षण घरीं खाजगी शिक्षक वा शिक्षिकेकडून झालं. हूपर नांवाच्या शिक्षिकेच्या हाताखालीं विजया-लक्ष्मींचं आरंभीचं बहुतेक सर्व शिक्षण झालें. हूपर बाई या अतिशय शिस्तीच्या भोक्त्या होत्या. त्यांचें शिकविणेंहि तसेंच तात्या पंतोजी-सारखें असे. विजयालक्ष्मींना त्यांचा हा स्वभाव आवडत असे म्हणून

त्यांच्या हाताखालीं शिक्षण घेतांना विजयालक्ष्मींना कंटाळवाणें असें कधींच वाटलें नाहीं. विजयालक्ष्मी १९०५ सालीं इंग्लंडला गेल्या होत्या, तेव्हांच या हूपर बाईंची त्यांची शिक्षिका म्हणून नेमणूक झाली. विजयालक्ष्मीनंतर त्यांची छोटी बहीण कृष्णा हिलाहि हूपर बाईनींच शिकविलें. १९१७ अखेरपर्यंत हूपर बाईनीं कृष्णाला शिकविलें. त्याच वर्षी हूपर बाईंचा विवाह झाला व नेहरू घराण्याशीं असलेले त्यांचे एक तपाचें संबंध संपुष्टांत आले.

## विवाह

१९२१ साल उजाडलें. नेहरूंची स्वरूप म्हणून प्रसिद्ध झालेल्या विजयालक्ष्मीनें विशी ओलांडली आणि त्याच वर्षी स्वरूप नेहरूंचा रणजित पंडितशीं विवाह झाला. हा परिचयोत्तर विवाह होता. रण-जितची नि स्वरूपची पहिली ओळख होती, मैत्री होती. आणि या मैत्रीचें पर्यवसानच विवाहांत झालें.

१० मे १९२१ रोजीं स्वरूप व रणजित यांचा विवाह झाला. स्वरूप नेहरू ही विजयालक्ष्मी पंडित झाली. विवाह समारंभ उभय घराण्यांच्या इभ्रतीला व इतमामाला शोभेल अशा थाटानें झाला. राजाच्या घरचें लग्न व्हावें असा हा सोहळा झाला.

शिवाय त्याच वेळीं अलाहाबादला कॉंग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक होती. या बैठकीच्या निमित्तानें पं. मोतीलालजींचे कित्येक स्नेही अलाहाबादला आलेच होते. त्यांत हा विवाह समारंभ. खास काश्मिरी पद्धतीनें करण्यांत आलेला. त्यावेळच्या सर्व महान् कॉंग्रेस नेत्यांनीं विजयालक्ष्मी व रणजित यांच्या लग्नाला हजर राहून त्यांना आशीर्वाद दिला.

## रणजित पंडित

रणजित पंडित हे विजयालक्ष्मींचे पति झाले. ते बॅरिस्टर होते. शिवाय इतिहासाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. हळव्या स्वभावाचे

क्रमांक... ३५३९ नोंद दि...

पण तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे रणजित पंडित एकदम नजरा खेंचून घेत. विजयालक्ष्मींसारखी सुस्वरूप, शालीन, कुलीन, सुशिक्षित स्त्री त्यांना लाभली हें त्यांचें भाग्य कीं रणजितांसारखा विद्वान पुरुष पति लाभला हें विजयालक्ष्मींचें भाग्य? तसें पाहिले तर दोघेजण फार भाग्यशाली होते असेंच म्हणावें लागेल.

## बत्तीस साल

१९३२ सालीं इंग्लंडमधील गोलमेज परिषद आटोपून गांधीजी भारतांत परत आले. आपल्या स्वागतार्थ जवाहरलाल आदि येतील असें त्यांना वाटत होतें, पण अलाहाबादहून मुम्बईस जातांना मधल्या एका स्टेशनवरच जवाहरलालजींना अटक करण्यांत आली होती. ४ जानेवारीला गांधीजींना व वल्लभभाईंना पकडण्यांत आलें. देशांतील सर्व कॉंग्रेस नेत्यांची एकदम धरपकड सुरू झाली.

## ताकीद

अलाहाबादला असलेल्या नेहरूंच्या आई, आणि बहिणी विजयालक्ष्मी पंडित व कृष्णा यांच्यावरहि नोटिसा बजावण्यांत आल्या. एक महिना-भर कोणत्याहि सभेंत वा मिरवणुकींत भाग घ्यावयाचा नाहीं. हरताळ पाडावयाचा नाहीं अशी तिघींना ताकीद देण्यांत आली.

पण दमदाटीनें गप्प बसणाऱ्या ह्या स्त्रिया नव्हत्या. मोतीलाल व जवाहरलाल या शूर पुरुषांच्या घराण्यांतल्या ह्या स्त्रिया 'गप्प रहा' म्हणून थोड्याच गप्प रहाणार?

## २६ जानेवारी

२६ जानेवारीला स्वातंत्र्यदिन होता. त्या दिवशीं अलाहाबादेंत एक सभा घेण्याचा बेत रचण्यांत आला. नेहरूंच्या आईनीं या सभेचें अध्यक्षपद स्वीकारलें आणि कित्येक दिवसांत अलाहाबादेंत झाली नाहीं अशी प्रचंड सभा भरली. लक्षावधि नागरिकांनीं त्या सभेला हजर राहून

राष्ट्रीय वृत्तीला पाठिंबा दिला. या सभेंत नेहरूंच्या आईनीं अत्यंत प्रखर भाषेंत भाषण केलें. सत्याग्रही पुढाऱ्यांना भ्याडपणें पकडून तुरुंगांत टाकणाऱ्या सरकारवर आग पाखडली. अत्यंत तडफदार व वीरश्रीनें ओतप्रोत भरलेलें असें तें त्यांचें भाषण होतें.

## लाटी हल्ला

पण या मिरच्या सरकारच्या नाकाला झोंबल्याशिवाय कशा राहतील! सभा संपण्यापूर्वीच पोलीसांनीं सभेंतील श्रोत्यांवर लाठीहल्ला केला. सभा उधळून लावली. लगेच ती बरखास्त केल्याचें नेहरूंच्या आईनें जाहीर केलें. या सभेच्या ठिकाणींच कित्येकांना अटक करण्यांत आली. अनेकजण जखमीहि झाले.

पण या सभेंत तिघांना अटक करण्यांत आली नाहीं! वास्तविक सरकारनें दिलेल्या सूचनेला त्यांनीं जुमानलें नव्हतें. जाणून बुजून सरकारी सूचनेकडे दुर्लक्ष करून सभा भरवली होती. पण त्यांना तेव्हां अटक झाली नाहीं. सभा संपल्यावर नेहरूंच्या आई, विजयालक्ष्मी व कृष्णा तिघीहि घरीं सुरक्षित परत गेल्या.

## पहिली शिक्षा

परन्तु दुसऱ्या दिवशीं सकाळींच पोलिस इन्स्पेक्टर आनंदभवनांत आला आणि फक्त दोघांनाच त्यानें अटक करून नेलें. आईला अटक केली नाहीं. ज्यांनीं भाषण केलें त्या बंधमुक्तच राहिल्या आणि विजया-लक्ष्मी पंडित व कृष्णा या दोघी बहिणींनाच अटक करून नेलें!

आईचा निरोप घेऊन दोघीजणी निघाल्या. मृदु अंतःकरणाच्या मातेनें आपलें हृदय कठीण केलें. थोरला मुलगा तर तुरुंगांत होतांच, आतां त्याच्या पाठोपाठ या बहिणीहि चालल्या होत्या!

विजयालक्ष्मींना एक वर्षाची शिक्षा झाली. त्यांना झालेली ही पहिली शिक्षा! कृष्णालाहि शिक्षा देण्यांत आली व लखनौ तुरुंगांत पाठ-

अ. नं. ९९३८८ ता. ५।८७

विण्यांत आलें. विजयालक्ष्मींना एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा व शिवाय दंड होता. कृष्णाला केवळ एक वर्षाची सक्तमजुरीच होती. दंड नव्हता. लखनौच्या तुरुंगांत त्यांना साडेअकरा महिने बंदिस्त करून ठेवण्यांत आलें. शेवटीं चांगल्या वर्तणुकीबद्दल पंधरा दिवसांची सरकारनें माफी दिली व एक वर्ष पुरे भरण्यापूर्वीच विजयालक्ष्मींची व त्यांच्या धाकट्या बहिणीची—कृष्णेची—मुक्तता केली.

## लखनौ तुरुंगांत

ह्या पहिल्या तुरुंगवासाच्या दोघींच्याहि अनेक आठवणी आहेत. या तुरुंगांत त्यांना खास स्त्रियांच्याच विभागांत टाकलें होतें. तिथें नाना तऱ्हेच्या, नाना व्याधींनीं पिडलेल्या स्त्रिया होत्या.कांहीं गुन्हेगार होत्या, नवऱ्याचा खून करून आलेल्या होत्या. कित्येकांना दीर्घ मुद्-तीच्या सजा होत्या. नेहरूंच्या या बहिणी त्यांच्यांत मिळून मिसळून राहिल्या. रक्तांनीं आणि अश्रूंनीं लिहिलेल्या त्या पतितांच्या कथा ऐकत राहिल्या.

तुरुंगांत दर दिवसानीं वजन करण्याचा शिरस्ता होता. एखादें वेळा जर कुणाचें वजन वाढल्यासारखें वाटलें तर मग तो मोठा विनोदाचाच विषय होत असे.

साडेअकरा महिन्यांचा तुरुंगवास संपला. तेथील अनेक मैत्रिणींचे निरोप घेतांना दोन्ही बहिणींचीं हृदयें उचंबळून आलीं. या दोघींचें तें दहा अकरा महिन्यापुरतेच घर होतें, पण त्या मैत्रिणी तेथें कित्येक दिवस काढणार होत्या. आयुष्यांतली अत्यंत महत्वाचीं वर्षें तुरुंगाच्या भिंतीआड होतांना त्या तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या होत्या, बाहेर पडतांना कदाचित् त्यांचें वार्धक्यहि झांकलेलें असेल ! त्या साऱ्या मैत्रिणींचा निरोप घेऊन दोघीजणी लखनौ तुरुंगांतून बाहेर पडल्या व त्यांना अलाहाबादला नेऊन मुक्त करण्यांत आलें.

### मध्यंतरांत

अलाहाबादला कांहीं दिवस राहून विजयालक्ष्मी कलकत्त्याला गेल्या व तेथून पुण्याला आल्या. पुण्याच्या वसतिगृहात्मक शाळेंत विजयालक्ष्मींच्या तीनहि मुली होत्या. सर्वांत धाकटी तर केवळ तीन वर्षांची होती !

मध्यंतरी १९३३ च्या आक्टोबर महिन्यांत विजयालक्ष्मींच्या धाकट्या वहिणीचें कृष्णाचें लग्न झालें. कृष्णानें गुणोत्तम हाथीसिंग या बॅरिस्टर झालेल्या तरुणाबरोबर विवाह केला.

### नगरपालिकेंत

तुरुंगांतून सुटल्यावर विजयालक्ष्मींचें सार्वजनिक जीवन पुन्हा सुरू झालें. बंदीवासापुरतेंच तें जणूं स्थगित झालें होतें. अलाहाबादेच्या नगरपालिकेच्या कार्यांत त्या भाग घेऊं लागल्या व १९३५ सालीं अलाहाबाद नगरपालिकेच्या अध्यक्षाहि झाल्या.

### कॉंग्रेस सत्ताधीश

१९३७ मध्यें निवडणुकी लढविण्याचा कॉंग्रेसपक्षानें निर्णय घेतला. निवडणुकीचें वातावरण देशभर पसरलें. कॉंग्रेसच्या प्रचंड प्रचारसभा होऊं लागल्या. जेथें जेथें कॉंग्रेसचे उमेदवार उभे होते तेथें तेथें त्यांचें यश निश्चित होतें. मोतीलालजी, गांधीजी आणि जवाहरलालजी यांची कॉंग्रेस तेव्हां देशांतील फार मोठी शक्ति होती. भारताच्या राष्ट्रीय वृत्तीचें प्रतीक होती. देशांत सर्वत्र कॉंग्रेसला प्रचंड पाठिंबा मिळाला व कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें अनेक प्रांतांत सत्तारूढ झालीं.

### मंत्री

संयुक्त प्रांतांतील— आतां उत्तर प्रदेशांतील-- विधिमंडळांतील एका जागेसाठीं कॉंग्रेसनें विजयालक्ष्मींची निवड केली व भरघोस यश मिळवून विजयालक्ष्मी निवडूनहि आल्या ! निवडून येतांच विजया-

लक्ष्मींवर अभिनंदनांचा वर्षाव झाला! पण विधिमंडळांतील निवडणुकींतील यशावर विजयालक्ष्मींची कर्तबगारी संपली नव्हती, संपणार नव्हती. संयुक्तप्रांत विधिमंडळांत तेव्हां काँग्रेस पक्षच बलिष्ठ होता. अर्थात काँग्रेसचें मंत्रिमंडळ संयुक्त प्रांतांत येणें अपरिहार्य होतें. काँग्रेसनें निवडलेल्या पक्षनेत्यानें संयुक्त प्रांताचें मंत्रिमंडळ बनविलें.

त्यांत विजयालक्ष्मींचीहि मंत्रि म्हणून निवड झाली! आरोग्य नीं स्थानिक स्वराज्य संस्था खात्याची जबाबदारी विजयालक्ष्मींनीं घेतली व काँग्रेसनें मंत्रिमंडळांचे राजीनामे देईपर्यंत योग्य रीतीनें ती पार पाडलीहि.

## कृष्णेनें केलेलें कौतुक

विजयालक्ष्मींच्या मंत्रिपदाबद्दल त्यांच्या धाकट्या बहिणीनें—कृष्णा हाथीसिंगनें—आपल्या एका इंग्रजी पुस्तकांत फार गौरवपूर्ण भाषेंत लिहिलें आहे. आपल्या पुस्तकांत कृष्णानें लिहिलें आहे.

—'लहानपणापासून स्वरूप ( विजयालक्ष्मी ) मोठी धोरणी होती. मंत्रि होण्यास ती खरोखरच योग्य होती. कसल्याहि नि कोणत्याहि परिस्थितींत स्वरूप शांतपणें वागते. अत्यंत स्थिर बुद्धीनें, मोहक व्यक्तिमत्त्वानें युक्त अशी स्वरूप आहे. ती प्रवाहपतित कधींच होणार नाहीं. सर्वांना जिंकून घेणें तिला मुळींच कठीण नाहीं. मंत्रि म्हणून तिनें चांगलेंच यश मिळविलें. या प्रकारचें काम तिनें पूर्वी कधींच केलें नव्हतें. पण तरीहि तिनें आपलें काम चोखपणें केलें. स्वरूपनें—विजयालक्ष्मींनीं—राजकारणांत भाग घेतला. तेव्हां तिचें वक्तृत्व पाहून आम्ही चकितच झालों! जणू ती जन्मजातच वक्तृत्वकलेंत पारंगत होती. सभा कशीहि नि केवढीहि असली तरी ती एवढीदेखील गोंधळून जात नसे. हिंदी व इंग्रजी या दोन्ही भाषांत तिचा वाक्प्रवाह अखंड चालूं राही.'

कृष्णा हाथीसिंगनें दिलेलें हें प्रशस्तिपत्रक विजयालक्ष्मीची मंत्रि म्हणून योग्यता सांगण्यास पुरेसें आहे.

## पुन्हा कारावास

१९३९ मध्यें कॉंग्रेसनें युद्ध सहकाराला नकार देऊन सत्ता सोडली. विजयालक्ष्मींनींहि मंत्रिपद सोडलें, कॉंग्रेसच्या चळवळींत त्या पुन्हा दाखल झाल्या. देशाच्या सेवेसाठीं रुजूं झाल्या. गांधीजींनीं वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. १९४१-४२ च्या या लढ्यांत विजयालक्ष्मींनीं आणखी दोनदां करावास सोसला. एकदा चार महिन्यांचा आणि दुसऱ्यांदा अकरा महिन्यांचा. पण त्यांस त्याचें काय? देशभक्तांना कारागृह हेंच प्रासादासारखें असतें !

## छत्र हरपलें

मध्यंतरींच्या काळांत एक दुर्दैवी घटना घडली आणि ती म्हणजे रणजित पंडित यांचें निधन! विजयालक्ष्मींचे पति स्वर्गस्थ झाले. विजयालक्ष्मींच्या जीवनावर तो एक मोठा आघात होता. तारुण्याच्या उंबरठ्याजवळ उभ्या असलेल्या आपल्या तीन सुंदर मुलींना आणि अजोड पत्नीला सोडून रणजित एकटे निघून गेले. विजयालक्ष्मी अनाथ झाल्या.

दुर्दैवाचा हा तीव्र प्रहार विजयालक्ष्मींनीं मोठ्या धैर्यानें सोसला. त्यांच्या अंगीं उपजतच सोशिकता आणि सहनशीलता जास्त होती. त्याची या वेळीं कसोटी लागली. मनाला झालेली ही जखम बुजविण्याचा यत्न करीत विजयालक्ष्मी देशसेवेला लागल्या.

## बिनविरोध निवड

पुन्हा १९४६ मध्यें निवडणुकी झाल्या. कॉंग्रेसनें या वेळीं निवडणुका लढविल्याच. उत्तर प्रदेशांत पुन्हा विजयालक्ष्मींना उभें करण्यांत आलें, पण त्यांना कोणीं विरोधच केला नाहीं. त्या पुन्हा बिनविरोध निवडून

आल्या ! आणि स्थानिक स्वराज्य संस्था व आरोग्यमंत्री म्हणून उत्तर प्रदेशच्या सरकारच्या मंत्रिमंडळांत चमकूं लागल्या.

पण त्यांच्या विशाल राष्ट्राभिमानाला लहानसें प्रांतीय क्षेत्र मानवणारें नव्हतें. १९४७ मध्येंच त्यांची रशियांत भारताचे वकील म्हणून नेमणूक करण्यांत आली.

## परदेशांत पहिली वकील स्त्री

परदेशांत वकील म्हणून जाणारी ही आशियांतली पहिली स्त्री होती ! तो अपूर्व मान विजयालक्ष्मींनीं पटकावला. त्यापूर्वी संयुक्त राष्ट्रसंघांत भारतीय शिष्टमंडळाचें नेतृत्वहि त्यांनीं केलें होतें. शिवाय व्हर्जिनिया ( अमेरिका ) येथें झालेल्या प्रशांत सागरी परिषदेंत त्या हजर राहिल्या होत्या. त्या निमित्तानें त्यांनीं अमेरिकेची सफर केली होती. परंतु परदेशांत वकील म्हणून जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

## रशियानंतर अमेरिका

१९४९ पर्यंत रशियांतील भारताच्या वकील म्हणून कामगिरी बजावल्यानंतर १९४९ मध्यें अमेरिकेंतील भारताच्या वकील म्हणून भारत सरकारनें त्यांची नेमणूक केली. रशिया व अमेरिका यांसारख्या अग्रेसर राष्ट्रांत राजदूत म्हणून कामगिरी बजावणें हें सोपें काम नव्हतें. जबाबदारीचें तर होतेंच, पण तेवढेंच नाजूक होतें. विजयालक्ष्मींसारखी मुत्सद्दी स्त्रीच तें करूं जाणें !

## बहुमान

अमेरिका नि रशिया या देशांत स्वदेशींची वकील म्हणून काम केल्यानंतर त्याहून जबाबदारीचें नि अवघड काम विजयालक्ष्मींवर येऊन पडलें. आणि तें म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ किंवा यूनोच्या सर्व-साधारण सभेचें अध्यक्षपद ! संयुक्त राष्ट्रसभेचें अध्यक्षपद प्रथमच

स्त्रीकडे आलें आणि तें देखील एका भारतीय स्त्रीकडे! भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासांत संस्मरणीय घटना घडली होती.

## युनोचें अध्यक्षपद

दोन वर्षे युनोचें अध्यक्षपद विजयालक्ष्मींनीं सांभाळलें. या निमित्तानें नि या नात्यानें त्यांनीं जगांतल्या सर्व राष्ट्रांना भेटी दिल्या. जगाची सफर केली. कुठें काय कमी आहे, जास्त आहे हें चोखंदळपणें पाहिलें. युनोतर्फे जेवढी मदत करतां येईल तेवढी दिली—नि जगांतील दलित राष्ट्रांचा दुवा घेतला. भारतीय स्त्री ही यूनोची अध्यक्ष असो किंवा चिमुकल्या संसाराची सारथि असो ती प्रेममूर्तीच असते हें विजयालक्ष्मींनीं जगाला दाखवून दिलें.

## यशस्वी वाटचाल

युनोच्या अध्यक्षपदाची मुदत संपल्यानंतर आतां अलीकडेच विजया-लक्ष्मींची इंग्लंडमधील भारताच्या वकील म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. तिसऱ्या क्रमांकाच्या वड्या राष्ट्रांत वकील म्हणून त्या गेल्या आहेत. अमेरिका व रशिया या राष्ट्रांत भारताचे प्रतिनिधित्व व युनोचें अध्यक्षपद या ठिकाणीं मिळविलेलें यश त्यांच्याजवळ आहे.

## महाराष्ट्राच्या राज्यपाल

परदेशांतील वकिली आणि युनोंतील भारताचे प्रतिनिधित्व अशी दुहेरी जबाबदारी बराच काळ पार पाडल्यानंतर नोव्हेंबर १९६२ मध्यें विजयालक्ष्मी महाराष्ट्राच्या राज्यपाल झाल्या. स्वतंत्र महाराष्ट्राचे राज्यपाल पद कांहीं काळ भूषविल्यानंतर त्यांनीं आपल्या पदाचा ऑगस्ट ६४ मध्यें राजीनामा दिला. पंडितजींच्या निधनानंतर पोरक्या झालेल्या देशांत नवजागृति करण्याचें कार्य यानंतर विजयालक्ष्मींनीं अंगावर घेतलें किंवा एखादें मंत्रिपद स्वीकारलें तर त्याचें आश्चर्य वाटायला नको, कारण त्यांची योग्यताच तेवढी आहे.

जगांतील एक पहिल्या दर्जाची स्त्री ही जगांतल्या इतर कोणत्याहि पुढारलेल्या देशांतील स्त्री इतकीच चतुर व बुद्धिवान आहे हें विजयालक्ष्मींनीं जगाला दाखवून दिलें आहे. या पुढची वाटचाल त्या तेवढ्याच यशस्वीपणें करतील याबद्दल कुणालाच शंका नाहीं.

◊ ◊ ◊

# राजेन्द्रप्रसाद



## नेहमीं पहिले

आपण एखाद्यावेळीं एखाद्या परीक्षेंत पहिले आलों तर आपल्याला कोण आनंद होतो! आणि सर्व विषयांत सर्व परीक्षांत जर पहिले आलों तर? मग तर आनंदाला सीमाच रहायची नाहीं आपल्या. पण असं

असून देखील ज्या माणसानं इवलाहि गर्व वाहिला नाहीं, असा एक महापुरुष आहे. तो पुरुष पहिल्या इयत्तेपासून महाविद्यालयांतल्या आणि विद्यापीठांतल्या सर्वोच्च परीक्षेपर्यन्त सतत पहिला आला. कोणत्याहि परीक्षेत त्यानें आपला पहिला नंबर सोडला नाहीं. इतकेंच नव्हे तर देशभक्तीच्या कठीण कसोटींतहि त्यानं आपलं प्रथम स्थान गमावलं नाहीं. म्हणूनच या देशाचा पहिला अध्यक्ष म्हणून पहिल्यांदा त्याच महापुरुषाची निवड झाली.

त्या महापुरुषाचं नांव राजेंद्रप्रसाद. भारताचे पहिले राष्ट्रपति म्हणून त्यांची एकदां निवड झाल्यानंतर निवडणुकीनंतर तेच पुन्हां दुसऱ्यांदा राष्ट्रपति झाले. १९५७ च्या निवडणुकीनंतरहि तेच पुन्हां राष्ट्रपति झाले.

## परोपकारी पित्याचा पुत्र

राजेंद्रप्रसादांचा जन्म बिहार प्रांतांतील सारण जिल्ह्यांतल्या जीरादेई नांवाच्या गांवांत ३ डिसेंबर १८८४ रोजीं झाला. राजेंद्रबाबूंच्या वडिलांचें नांव महादेव सहाय. ते अतिशय उदार आणि परोपकारी गृहस्थ होते. त्यांना वैद्यकीचें ज्ञान अवगत असल्यामुळें गोरगरिबांना मोफत औषधोपचार करण्यांत त्यांना आनंद वाटे. त्यांना एकंदर पांच मुलें झालीं. तीन बहिणी दोन मुलांत राजेंद्रबाबू सर्वांत धाकटे.

## वीस हजारांत पहिले

राजेंद्रबाबूंनीं आपल्या शालेय शिक्षणाला आरंभ १८९३ सालीं छपरा येथें केला. त्यापूर्वीं गांवांतल्या मौलवीकडे त्यांनीं फार्सीचें शिक्षण घेतलें होतें. शाळेंत नांव दाखल केल्यावर लगेच त्यांना बुद्धीचा प्रभाव दिसून आला नि त्यांच्या मुख्याध्यापकांनीं खूष होऊन राजेंद्रबाबूंना एकदम तिसऱ्या इयत्तेंत बसवलें. १९०२ सालीं राजेंद्रबाबू कलकत्ता विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले–नि वीस हजार विद्यार्थ्यांत सर्वप्रथम आले ! राजेंद्रबाबूंचा हा पहिला महत्त्वाचा विक्रम.

मॅट्रिक झाल्यावर त्यांनीं कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत आपलें नांव नोंदवलें. अनेक शिष्यवृत्त्या मिळवीत व प्राध्यापकांनीं केलेल्या गौरवाचा स्वीकार करीत राजेंद्रबाबूंचें महाविद्यालयीन शिक्षण पार पडलें. बी. ए. ला त्यांना पहिला वर्ग मिळाला. १९०७ सालीं राजेंद्रबाबू एम्. ए. झाले, मात्र या वेळीं त्यांचा पहिला वर्ग हुकला.

## संघटनेचा श्रीगणेशा

विद्यार्थिजीवनांतच राजेंद्रबाबू आपल्या भावी जीवनाची तयारी करीत होते. अत्यंत साधेपणानें नि निरलसपणानें वागणारा सज्जन विद्यार्थी म्हणून राजेंद्रबाबूंचा लौकिक होता. कलकत्त्याला असतांना 'अरुण मंडळ' नांवाच्या धार्मिक संस्थेच्या कार्यांतहि ते सक्रिय भाग घेत असत. कलकत्त्याला असलेल्या बिहारी विद्यार्थ्यांच्या 'बिहारी क्लब' ह्या संस्थेशींहि राजेंद्रबाबूंचा संबंध आला. १९०६ सालीं या क्लबमार्फत राजेंद्रबाबूंनीं कलकत्त्यांतील बिहारी मंडळींचें एक स्नेहसंमेलन घडवून आणलें. राजेंद्रबाबूंच्या संघटन शक्तीचा हा पहिला प्रत्यय होता !

## कॉंग्रेस स्वयंसेवक

१९०६ सालीं अखिल भारतीय कॉंग्रेस अधिवेशन कलकत्त्याला भरलें होतें. राजेंद्रबाबूंनीं पाहिलेलें हें पहिलें कॉंग्रेसचें अधिवेशन. या अधिवेशनांत राजेंद्रबाबूंनीं स्वयंसेवकाचें काम केलें ! दादाभाई नौरोजी या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

## प्राध्यापक

एम् ए. झाल्यावर राजेंद्रबाबू भूमिहार ब्राह्मण कॉलेजांत प्राध्यापक झाले. या कॉलेजची स्थिति तेव्हां अनुकंपनीय होती. राजेंद्रबाबूंनीं तेथेंच नोकरी स्वीकारली. याच वेतनावर ते संतुष्ट होते. तेथें ते इंग्रजी-प्रमाणेंच राज्यशास्त्र, अर्थशास्त्र हे विषयहि राजेंद्रबाबूंना शिकवावे लागत. जेमतेम एक वर्षभर राजेंद्रबाबू या कॉलेजांत होते. पण तेवढ्यांत कॉलेजचे प्राचार्य म्हणूनहि त्यांनीं कांहीं दिवस काम केलें.

भूमिहार ब्राह्मण कॉलेजनंतर कलकत्त्याच्या सिटी कॉलेजांत राजेंद्र-बाबूंनीं कांहीं दिवस इतिहास व अर्थशास्त्र हे विषय शिकवले. पुढें कलकत्त्याच्या कोर्टांत वकिली करीत असतांना तेथील लॉ कॉलेजांतहि राजेंद्रबाबूंनीं १९१४ ते १९१६ अशीं दोन वर्षें प्राध्यापकाचें काम केलें व त्या कॉलेजचा लौकिक वाढवला.

देशसेवा करण्याची इच्छा असलेल्या हुषार तरुणांचें संघटन नामदार गोखले याच सुमारास करीत होते. त्यासाठीं त्यांनीं 'भारत सेवक समाजहि' स्थापन केला होता. या समाजांत दाखल होण्याची त्यांनीं राजेंद्रबाबूंना विनंति केली.

### गोखल्यांना नकार

आणि राजेंद्रबाबूंनीं ती नाकारली! वास्तविक ना. गोखल्यांना नकार देतांना राजेंद्रबाबूंना अत्यंत खेद वाटत होता. आपल्या थोरल्या बंधूंचा त्यांनीं या बाबतींत सल्ला घेतला. त्यांच्या घरच्या मंडळींची राजेंद्रबाबूंपासून फार मोठी अपेक्षा होती. वर्षानुवर्षें गरीबींत दिवस कंठलेलें प्रसाद कुटुंब श्रीमंतीची पहांट केव्हां होते याची वाट पाहात होते. ती पहांट दाखविणारा सूर्य अर्थातच राजेंद्रबाबू हाच होता आणि म्हणूनच सर्वांची दृष्टि त्यांच्यावर होती. यामुळेंच इच्छा असूनहि कलकत्त्यांतली वकिली सोडून राजेंद्रबाबूंना 'भारत सेवक समाजांत' दाखल होणें शक्य झालें नाहीं. एप्रिल १९१० मध्यें हा प्रसंग घडला.

### वकिलीचा अनुभव

१९११ पासून राजेंद्रबाबूंनीं वकिलीचा व्यवसाय सुरू केला. कलकत्त्याच्या हायकोर्टांत त्यांनीं प्रथम वकिली सुरूं केली. त्याच वेळीं एल्. एल्. एम्. या कायद्याच्या सर्वोच्च परीक्षेचा राजेंद्रबाबू अभ्यास करीत होते. १९१५ सालीं ते एल्. एल्. एम्. ला बसले, व पहिल्या वर्गांत पहिले आले.

१९१६ च्या मार्चपर्यंत राजेंद्रबाबूंनीं कलकत्त्याच्या हायकोर्टांत वकिली केली. पण त्यानंतर बिहार प्रांतांत पाटण्याला हायकोर्ट स्थापण्यांत आल्यामुळें इतर बिहारी वकिलांबरोबर त्यांनींहि कलकत्ता सोडलें. कलकत्त्यांत वकिली करीत असतांना चित्तरंजन दास, रासबिहारी घोष, लॉर्ड सिंह इत्यादि कलकत्त्यांतील ज्येष्ठ श्रेष्ठ वकिलांशीं त्यांना सामना द्यावा लागला होता !

१९१६ पासून १९२० पर्यंत जेमतेम चार वर्षें राजेंद्रबाबूंनीं पाटण्याला वकिली केली असेल नसेल. तेवढ्यांत १९२० सालीं गांधीजींची असहकारितेची चळवळ सुरू झाली नि अमीर होण्याऐवजीं राजेंद्रबाबू फकीर बनून देशसेवेला लागले.

### देशासाठीं फकीर !

गांधीजींचा नि राजेंद्रबाबूंचा परिचय झाला तो चंपारण्यांत. त्यानंतर १९२० सालीं गांधीजींच्या असहकारितेच्या आंदोलनांतहि राजेंद्रबाबूंनीं हिरीरीनें भाग घेतला. राजेंद्रबाबूंनीं वकिली सोडली ती याच वेळीं. १९२० सालीं भरलेल्या बिहार प्रांतिक परिषदेचे राजेंद्रबाबू अध्यक्ष होते. बिहारच्या कॉंग्रेस चळवळीचें नेतृत्व त्यांच्याकडेच होतें. कॉंग्रेसच्या कार्यासाठीं राजेंद्रबाबू अहोरात्र झटूं लागले. स्वदेशी, स्वराज्य इ० चतु:सूत्री त्यांनीं अंमलांत आणली. तेव्हांपासून राजेंद्रबाबू सतत कॉंग्रेसची सेवा करीत आहेत.

१९२८ सालीं वकिलीच्या एका कामासाठीं राजेंद्रबाबू लंडनला गेले होते. तेथून ते ऑस्ट्रियाला गेले. तेथें फेन्नर ब्रॉक्वे यांच्या अध्यक्षतेखालीं आंतरराष्ट्रीय युद्धविरोधी संमेलन होतें. राजेंद्रबाबू त्या संमेलनाला भारताचे एकमेव प्रतिनिधि म्हणून हजर राहिले.

तेथें असतांनाच ऑस्ट्रियांतील एका गांवीं राजेंद्रबाबूंचें व्याख्यान ठरविण्यांत आलें. ठरलेल्या वेळीं राजेंद्रबाबू व्याख्यानाच्या ठिकाणीं गेले—

**व्याख्यानाबद्दल बक्षिस?**

पण त्यांना प्रसाद मिळाला तो वेगळाच! त्यांचें व्याख्यान तर झालें नाहींच पण लाथाबुक्क्यांचा प्रसाद खावा लागला. ठोसे तर इतके खाल्ले कीं त्यामुळें ते बेशुद्धच व्हावयाचे. एकानें तर त्यांच्यावर सुराहि उगारला, पण त्यांच्या एका प्राध्यापक मित्राच्या मध्यस्थीनें ते या हल्यांतून बचावले. हल्लेखोरांचा राजेंद्रबाबूंना ठार करण्याचाच बेत होता पण तो सिद्धीस जाऊं शकला नाहीं.

पण तो हल्ला राजेंद्रबाबूंवर कां करण्यांत आला? राजेंद्रबाबू कोणाचे शत्रु होते? ते तर अजातशत्रु. मग असें कां घडलें?

राजेंद्रबाबूंवर हा जो अमानुष हल्ला झाला तो केवळ गैरसमजामुळें झाला असें नंतर उघडकीस आलें. वास्तविक त्या ठिकाणीं एका क्रांतिकारक पत्रकाराचें व्याख्यान व्हावयाचें होतें. तो गैरहजर राहिल्यानें राजेंद्रबाबूच ते पत्रकार आहेत असा हल्लेखोरांचा समज होऊन त्यांनीं राजेंद्रबाबूवर हल्ला केला!

असें जरी असलें तरी त्यामुळें राजेंद्रबाबूंना झालेल्या जखमा तत्काळ भरत आल्या थोड्याच?

**पहिली शिक्षा**

१९३० सालीं गांधीजींनीं कायदेभंगाची देशव्यापी चळवळ सुरू केली. बिहारचा क्रम या आंदोलनांत दुसरा होता. एकट्या बिहार प्रांतांतले १४२५१ लोक या चळवळींत तुरुंगांत गेले. राजेंद्रबाबू बिहारचे नेते होते. या लढ्यांत राजेंद्रबाबूंवर लाठीधारी व अश्वारूढ पोलिसांनीं हल्ले चढवले पण राजेंद्रबाबू त्यांतून बचावले. ५ जुलै १९३० रोजीं त्यांना कायदेभंगाबद्दल अटक करण्यांत येऊन सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यांत आली.

१९३२ सालीं पुन्हां कायदेभंगाची दुसरी चळवळ सरू झाली. राजेंद्र-

बाबूंनीं पुन्हां लढ्याचें नेतृत्व स्वीकारलें. ४ जानेवारी १९३२ रोजीं त्यांना पुन्हां पकडून सहा महिन्यांचीच तुरुंगवासाची शिक्षा पुन्हां देण्यांत आली. जूनमध्यें राजेंद्रबाबू सुटले तेव्हां त्यांची प्रकृति पुष्कळच खालावली होती.

## प्रकृति बिघडली !

पण देशसेवेपुढें प्रकृतिकडे लक्ष द्यायला राजेंद्रबाबूंना फुरसत होती कुठें ? थोडीफार विश्रांति घेऊन राजेंद्रबाबू पुन्हां कार्यमग्न झाले. मध्यंतरीच्या १९३१ च्या ३२ व्या कॉंग्रेसचे तेच हंगामी अध्यक्ष होते. ४ जानेवारी १९३३ रोजीं गांधीजींच्या अटकेचा पहिला वाढदिवस होता. राजेंद्रबाबूंनीं एक पत्रक काढलें–नि बेकायदा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून ते पकडले गेले. यावेळीं त्यांना पंधरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्मावण्यांत आली. पण हजारीबागच्या तुरुंगांत त्यांची प्रकृति बिघडूं लागली. पाटण्याच्या जनरल हॉस्पिटलमध्यें त्यांना हलविण्यांत आलें पण प्रकृतीस उतार पडेना. शेवटीं तुरुंगवासाची मुदत पूर्ण भरण्याआधीं तीन महिने सरकारनें राजेंद्रबाबूंना सोडून दिलें.

१७ जानेवारी १९३४ हा तो दिवस.

## बिहार भूकंप

तुरुंगांतून सुटल्याबरोबर राजेंद्रबाबूंनीं बिहार भूकंपाच्या कार्याला सर्वस्वी वाहून घेतलें. भूकंपग्रस्त बिहार त्यांच्या मुक्ततेची जणूं वाटच पहात होता. भूकंपग्रस्तांना साहाय्य देण्याची जी कामगिरी राजेंद्रबाबूंनीं या काळांत केली ती चिरस्मरणीय ठरली.

मध्यंतरींच्या काळांत कॉंग्रेसमधील स्वराज्य पक्षाचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें आणि कॉंग्रेसनें विधिमंडळांत प्रवेश करावा असें ठरविण्यांत आलें. गांधीजींच्या कायदेभंग तहकुबीच्या सूचनेला मान्यता देण्यांत आली आणि, मुंबई येथें राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं ४८ वी कॉंग्रेस भरण्याचें निश्चित झालें.

राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या मुंबई कॉंग्रेसच्या अधिवेशनाचें स्वरूप थोडें वेगळें होतें. या कॉंग्रेसला प्रतिवर्षीप्रमाणें राष्ट्रीय महोत्सवाचें स्वरूप आलें होतें परंतु गांधीजींनीं विधायक कार्यक्रमासाठीं कॉंग्रेसचा राजीनामा दिल्यामुळें एक प्रकारचें खिन्नतेचें वातावरण पसरलें होतें. परंतु त्याचबरोबर कॉंग्रेसनें विधिमंडळांत प्रवेश करण्याचा बेत योजिल्यामुळें थोडाफार उत्साहहि होता. या अधिवेशनांतच कॉंग्रेसची घटना आमूलाग्र बदलण्यांत आली.

## निवडणुकींत कॉंग्रेस पक्ष

१९३५ मध्यें कॉंग्रेसला पन्नास वर्षे झालीं म्हणून कॉंग्रेसचा सुवर्ण-महोत्सव थाटामाटांत साजरा करण्यांत आला. १९३६ च्या एप्रिल व डिसेंबरमध्यें झालेली कॉंग्रेसची लखनौ व फैजपूर अधिवेशनें जवाहरलाल नेहरूंच्याच अध्यक्षतेखालीं पार पडली. फैजपूर कॉंग्रेसला विधिमंडळाच्या निवडणुकींत कॉंग्रेसनें भाग घ्यावयाचा या निर्णयावर शिक्कामोर्तब झालें व कॉंग्रेस पुढाऱ्यांचे प्रचारार्थ तुफानी दौरे सुरू झाले.

निवडणुका पार पडल्या. सात प्रांतांत कॉंग्रेसला बहुमत मिळालें व कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें स्थापन झालीं. मुंबईचें मंत्रिमंडळ बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखालीं सिद्ध झालें. दारूबंदी, स्वदेशीचा पुरस्कार इत्यादि कॉंग्रेसमान्य तत्त्वें आचरणांत आणणें आतां सोपें झालें.

पण हीं मंत्रिमंडळें फार काळ टिकू शकलीं नाहींत. हरिपुरा कॉंग्रेस होईपर्यंत तीं टिकलीं. युरोपावर युद्धाचे ढग जमूं लागले. हिटलरची साम्राज्यलालसा वाढूं लागली. इटलीच्या मुसोलिनीनेंहि प्रदेशाची हांव धरली. इंग्लंडच्या साम्राज्याला तडे जाण्याची वेळ येतांच इंग्लंड युद्धांत पडलें !

## राजीनामे

पण भारताची युद्धांत भाग घेण्याची तयारी नव्हती; परंतु इंग्लंडनें

भारताला जबरदस्तीनें युद्धांत ओढलें. कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळानें युद्धाची कारणें विचारलीं, पण सरकारला कॉंग्रेसकडे लक्ष द्यायला फुरसतच नव्हती. याचा परिणाम व्हायचा तोच झाला, देशांतील कॉंग्रेस मंत्रि· मंडळांनीं राजीनामे दिले.

## कटु कारवाई

मध्यतंरीच्या काळांत राजेंद्रबाबूंना एक कटु कारवाई करावी लागली आणि ती म्हणजे सुभाषचंद्र बोस यांना अर्धचंद्र देणें ही होय ! हरिपुरा कॉंग्रेसपासून सुभाषबाबूंचें व कॉंग्रेसचें बिनसत चाललें होतें. पूर्वीच्या दोन अधिवेशनांचे सुभाषबाबूच अध्यक्ष होते पण पुढें मतभेद इतके विकोपाला गेले कीं, गांधीजींच्या सल्ल्यानें सुभाषबाबूंनीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व त्यांच्या जागीं राजेंद्रबाबूंची नियुक्ति केली. पुष्कळांना हें कृत्य नापसंत होतें !

पण एवढ्यावरच हें प्रकरण थांबतें तर बरें होतें. परंतु तसें झालें नाहीं. सुभाषबाबू अध्यक्षपदापासून दूर झाले नि त्यांचा कॉंग्रेसविरोध दुणावलेला. ते कॉंग्रेसला विरोधी अशीं भाषणें करूं लागले. लेख लिहूं लागले. कॉंग्रेसला बदनाम करण्याचा यत्न करूं लागले. मग मात्र त्यांच्याविरूद्ध उपाययोजना करणें भाग पडलें व ही कटु कामगिरी अध्यक्ष या नात्यानें राजेंद्रबाबूंकडे आल्यामुळें त्यांना विशेषच वाईट वाटलें !

## बेचाळीसची नांदी

मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं १९४० सालीं रामगडला कॉंग्रेसचें अधिवेशन पावसांत पार पडलें. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष राजेंद्रबाबूच होते. या अधिवेशनानंतर राजकीय आकाशांतले रंग भराभर पालटूं लागले. वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू झाली.

काँग्रेस व सरकार यांची तडजोड होणें मुष्किल झाले, क्रिप्सची योजना फेटाळली गेली नि जपान भारताच्या पूर्वेला धडकूं लागला.

बेचाळीसच्या लढ्याची पार्श्वभूमि ही अशी होती !

८ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबईला अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक भरली तेव्हां राजेंद्रबाबू पाटण्याला होते. दम्याच्या विकारामुळें त्यांची प्रकृति बिघडली होती.

### बांकीपूर तुरुंग

९ ऑगस्टला गांधीजींनीं आपला सुप्रसिद्ध 'चले जाव' ठराव काँग्रेस समितींत मांडला नि देशभर काँग्रेस नेत्यांची धरपकड सुरू झाली. पाटण्याला व्याधिजर्जर राजेंद्रबाबूंवरहि पकडवॉरंट आलें नि त्यांची तेथील बांकीपूर तुरुंगांत रवानगी करण्यांत आली, त्यांना इतर कार्यकारिणीचे सदस्य जेथें होते त्या अहमदनगर किल्ल्यांत नेण्याची प्रथम योजना होती पण पुढें ती बारगळली.

### राजेंद्रबाबूंचें ग्रंथलेखन

या तुरुंगवासांतच त्यांनीं आपला 'विभाज्य भारत' हा ग्रंथ लिहिला. पाकिस्तानच्या मागणीवर या साऱ्या ग्रंथाची रचना करण्यांत आली आहे. राजेंद्रबाबूंनीं या ग्रंथाच्या निमित्तानें पाकिस्तानविषयक अनेक ग्रंथ, पुस्तकें व लिखाणें अभ्यासिलीं. पाकिस्तानच्या मागणींतील तथ्य व फोलपणा दोन्हींचा सांगोपांग विचार केला व शेवटीं पाकिस्तान हें कसें अव्यवहार्य आहे हें सांगणारा हा प्रदीर्घ ग्रंथ निर्मिला.

### स्फूर्तिदायी आत्मकथा

'विभाज्य भारत' या ग्रंथाप्रमाणेंच आपल्या 'आत्मकथा' नामक हिंदी आत्मचरित्राचा बराचसा भाग तुरुंगवासांतच लिहिला, स्मरणशक्तीवर अवलंबून त्यांनीं आपली आत्मकथा लिहिण्यास आरंभ केला. त्यांना रोजनिशी लिहिण्याची संवय नसल्यानें स्मरणशक्तीवर विसंबणें

त्यांना भाग पडलें. तुरुंगांतून मुक्त झाल्यावर आपली प्रदीर्घ आत्मकथा पुरी केली. साडेसहाशे पृष्ठांचें हें पुस्तक जुलै १९४६ मध्यें प्रसिद्ध झालें. या पुस्तकाला वल्लभभाई पटेलांची प्रस्तावना आहे. त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'हें पुस्तक जो कोणी वाचील त्याला आपलें जीवन उन्नत करण्याची स्फूर्ति मिळेल' सरदार पटेलांच्या या अवतरणावरून राजेंद्रबाबूंच्या आत्मकथेचें श्रेष्ठत्व कळून येईल.

## त्रिमंत्री योजना स्वीकारली

१४ जून १९४५ रोजीं कॉंग्रेसच्या कार्यकारिणीच्या मुक्तीची घोषणा लॉर्ड वेव्हेल यांनीं केली. ते तेव्हां व्हाईसरॉय होते. गांधीजींची सुटका आधींच झाली होती. राष्ट्रीय मंत्रिमंडळाचा बेत शिजूं लागला. सिमला परिषद भरली नि असफल झाली. १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकांत पुन्हां सात प्रांतांत कॉंग्रेसला भरघोस यश मिळालें. ब्रिटिश त्रिमंत्र्यांनीं एक योजना सादर केली. पाकिस्तान त्यांत अव्यवहार्य ठरवलें. कॉंग्रेसनें ती योजना स्वीकारली. मुस्लीम लीगनें फेटाळली. घटना परिषदहि घेण्याचें ठरलें व त्याप्रमाणें योजना राबविण्यास सुरवात झाली.

दिल्लीला जवाहरलालजींच्या नेतृत्वाखालीं हंगामी मंत्रिमंडळ स्थापन झालें. राजेंद्रबाबू त्यांत मंत्री झाले.

याच वेळीं 'मुस्लीम लीग' नें प्रत्यक्ष प्रतिकाराची अमानुष चळवळ सुरू केली. लीगनें हंगामी मंत्रिमंडळांत भाग नाकारला, घटना परिषदेशी असहकार केला नि पाकिस्तान मिळवलें !

## घटना परिषदेचे अध्यक्ष

९ डिसेंबर १९४६ रोजीं ठरल्याप्रमाणें, मुस्लीम लीगशिवाय घटना परिषद सुरू झाली. भारताची घटना निर्मिण्याचा साहसी प्रयत्न सुरूं झाला. राजेंद्रबाबूंना घटना परिषदेचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. सार्वभौम, स्वतंत्र व प्रजासत्ताक भारताची घटना शिल्पित होऊं लागली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारत संपूर्ण स्वतंत्र झाला. कराची पाकिस्तानची राजधानी झाली. घटना परिषदेचें काम यामुळें थोडें सुकर झालें व वेगांत घटना निर्मितीची प्रक्रिया सुरूं झाली. या कामांत डॉ. भीमराव आंबेडकरांचा सिंहाचा वांटा होता.

## पुन्हां कॉंग्रेसचे अध्यक्ष

घटना परिषदेचे अध्यक्ष असतांनाहि राजेंद्रबाबू भारत सरकारचें अन्नमंत्री म्हणून काम पाहात होते, हे मुद्दाम सांगायला हवें.

मधल्या काळांत मीरत कॉंग्रेसचे अध्यक्ष कृपलानी यांनीं मतभेद होऊन अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व पुन्हां कॉंग्रेसचे अध्यक्षपद राजेंद्रबाबूंकडे आलें.

## स्मारकनिधी

३० जानेवारी १९४८ रोजीं महात्मा गांधींची हत्या झाल्यानंतर राजेंद्रबाबूंच्या अध्यक्षतेखालीं महात्मा गांधी स्मारक निधिची स्थापना करण्यांत आली. गांधीजींच्या हत्येमुळें आपल्या देशांतला एक महापुरुष हरपला, त्याचें यथायोग्य स्मारक करण्याच्या उद्देशानें उभारण्यांत आलेल्या गांधी स्मारक निधीचें अध्यक्षपद राजेंद्रबाबूंकडे आलें हेंहि योग्यच झालें. तेच गांधीजींचे खरे निष्ठावंत अनुयायी.

## राष्ट्राध्यक्ष राजेंद्रप्रसाद

डिसेंबर १९४९ मध्यें भारतीय घटनेच्या निर्मितीचें कार्य पूर्ण झालें. स्वतंत्र, सार्वभौम व प्रजासत्ताक भारताची मुहूर्तमेढ करणारी घटना २६ जानेवारी १९५० पासून अंमलांत आणण्याचें ठरलें. या घटनेप्रमाणें पूर्वीच्या व्हाईसरॉय किंवा गव्हर्नर जनरलची हकालपट्टी करून तेथें राष्ट्रपतींची योजना करण्यांत आली.

२४ जानेवारी १९५० रोजीं राष्ट्राध्यक्ष किंवा राष्ट्रपतींची नियडणूक होती. पं. नेहरूंनीं भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून राजेंद्रबाबूंचें नांव

सुचवलें. वल्लभभाई पटेलांनीं त्यांना अनुमोदन दिलें व एकमतानें राजेंद्रबाबू भारताचे पहिले राष्ट्रपति निवडले गेले.

राजेंद्रबाबूंनीं नम्रतापूर्वक ही जबाबदारी स्वीकारली. २६ जानेवारी १९५० हा तो दिवस.

## दुसऱ्यांदा निवड

त्यानंतर १९५२ सालीं पुन्हां सार्वत्रिक निवडणुका झाल्या व राजेंद्रबाबूंनाच पुन्हां राष्ट्राध्यक्ष निवडण्यांत आले. राजेंद्रबाबूंच्या लोकप्रियतेचा हा पुरावाच नव्हे काय? ५७ च्या निवडणुकीं नंतर याच प्रकाराची पुनरावृत्ति झाली.

## नेपाळला भेट

आजपर्यंत भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू अनेकदां जगांतल्या निरनिराळ्या राष्ट्रांना भेटी देऊन आले. त्याप्रमाणें जगांतले अनेक राष्ट्रांचे प्रमुखहि दिल्लीला आले.पण राजेंद्रप्रसादांनीं आपल्या राष्ट्राध्यक्षाच्या कारकीर्दीत भारताबाहेर पाऊल टाकलें नव्हतें.

ते त्यांनीं प्रथम आक्टोबर १९५६ मध्यें टाकलें. भारताचे राष्ट्राध्यक्ष या नात्यानें त्यांनीं नेपाळला भेट दिली. त्यानंतर जपान, मलाया आदि पूर्वेकडच्या देशांनाहि त्यांनीं भेटी दिल्या व भव्य स्वागत समारंभांत भाग घेतला. राजेंद्रबाबूंसारखा सज्जन, त्यागी, आणि विद्वान् नेता आपल्या देशाला पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून लाभला हें आपल्या देशाचें भाग्यच नव्हे काय? नेपाळप्रमाणेंच रशिया आणि अमेरिकेलाहि राजेंद्रबाबूंनीं भेटी दिल्या.

## निवृत्ति आणि निधन


ओळीनें दोन वेळा भारताचे राष्ट्रपतिपद भूषविल्यानंतर पुन्हां तिसऱ्यांदा हें पद स्वीकारण्याचें राजेंद्रबाबूंनीं नाकारलें आणि १९६२ च्या

जूनमध्यें डॉ. राधाकृष्णन् राष्ट्रपति झाल्यावर राजेंद्रबाबू सदाकत आश्रमाच्या आपल्या आवडत्या कार्याकडे वळले. सेवेचें हें कार्य करीत असतांनाच २८ फेब्रुवारी १९६३ रोजीं ते निधन पावले आणि भारत एका थोर पुरुषाला मुकला.

◇ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम .......... दि ..............
क्रमांक .......... नोंद दि.. ..........

# रवींद्रनाथ टागोर



## महान् लेखक

बंगाली भाषेंत ज्यांनीं पंचवीस नाटकें, पन्नास काव्यग्रंथ, पंधरा कादंबऱ्या आणि पस्तीस निबंधसंग्रह लिहिले, एवढेंच नव्हे तर इंग्रजी भाषेंतहि ज्या महापुरुषानें पंचेचाळीस ग्रंथ लिहिले त्या महापुरुषाचें

नांव आहे रवींद्रनाथ टागोर. ‘ गीतांजलि ’ या आपल्या काव्यसंग्रहानें ज्यांनीं जगाला वेड लावलें व अजोड असें नोबेल पारितोषिक प्राप्त करून घेतलें तेच हे रवींद्रनाथ. रवींद्रनाथ हे भारतांतील पहिल्या दर्जाचे कवि नि कथाकार आहेत. रवींद्रनाथांनींच भारताच्या साहित्य सुगंधाचा दरवळ चोहींकडे नेला.

### जन्म

रवींद्रनाथांचा जन्म ६ मे १८६१ रोजीं कलकत्त्याला झाला. त्यांच्या वडिलांचें नांव देवेंद्रनाथ. देवेंद्रनाथ टागोरांना महर्षि अशी पदवी जनतेनें दिली होती. रवींद्रनाथांचें घराणें अवघ्या बंगालमध्यें लक्ष्मी सरस्वतीचें माहेरघर म्हणून विख्यात होतें. रवींद्रनाथांचे वडील दवेद्रेंनाथ ब्राह्म समाजाचे कार्यकर्ते होते. रवींद्रनाथांचे बंधूहि श्रेष्ठ साहित्यिक नि श्रेष्ठ शासक म्हणून प्रसिद्ध होते. एकंदर टागोरांचें घराणें म्हणजे विद्या नि कला यांचें आश्रयस्थान होतें यांत शंका नाहीं.

रवीन्द्रनाथांची आई लहानपणींच स्वर्गस्थ झाली; नि रवीन्द्रनाथांचा जन्म झाला तेव्हां देवेंद्रनाथांनीं संन्यासाश्रम स्वीकारला होता. रवींद्र-नाथांची जबाबदारी घरच्या नोकरचाकरांवर त्यामुळें येऊन पडली व त्यांनीं ती पार पाडलीहि.

### शाळा चुकविली

रवीन्द्रनाथांना घरीं शिकविण्यासाठीं मास्तर होते. रवींद्रनाथांना शाळा कधींच आवडली नाहीं. शाळेंत ते नियमितपणें गैरहजर असत. कधीं धाकानें शाळेंत गेले तर शाळेंतून बाहेर कसे पळतां येईल याचा ते विचार करीत ! लहानपणीं आपल्या घराच्या गच्चीवर उभे राहून सभोंवतीची नगरी तास न् तास पाहात राहणें हा रवींद्रनाथांचा आव-डता छंद होता. कदाचित् त्या वेळेला त्यांची प्रतिभा जागृत होऊं लागली असेल. रवींद्रनाथांचे वडील क्वचितच घरीं असत. सतत ते प्रवासांत असल्यामुळें घरीं असा त्यांचा मुक्काम थोडाच असे. प्रवासांत

कधीं रवींद्रनाथहि त्यांच्या बरोबर असत. विशेषतः हिमालय प्रदेशांतील प्रवासांत रवींद्रनाथांना हिमालयांतून हिंडणें फार प्रिय असे.

### खरें शिक्षण

रवींद्रनाथांचें शिक्षण असें फार थोडें झालें. शाळा कॉलेजांत जाणें त्यांच्या स्वैर वृत्तीला कधींच मानवलें नाहीं. वनराजींतून हिंडतां हिंडतां सृष्टिमातेबद्दल त्यांनीं जें ज्ञान घेतलें तेंच त्यांना अखेरपर्यंन्त उपयोगी पडलें.

### छंदी !

रवींद्रनाथांना चौदा वर्षें पूर्ण होण्यापूर्वींच लिहिण्याचा छंद लागला होता व त्यांचे एकदोन लेख व कांहीं कविता प्रसिद्धहि झाल्या होत्या. त्याच सुमारास त्यांचा भाऊ ज्योतिरिंद्र टागोर यानें ‘ भारती ’ नांवाचें मासिक सुरू केलें. रवींद्रनाथांनीं लगेच ‘ भारती ’ मासिकांत लेखन करण्यास आरंभ केला. त्यांच्या सुरुवातीच्या बहुतेक कविता ‘ भारती ’ मासिकांतच प्रसिद्ध झाल्या व कवि म्हणून ते बंगाली जनतेसमोर आले.

### लेखनाची सुरुवात

काव्यलेखनाला रवींद्रनाथांनीं सुरुवात केली ती अशी. शेले हा विख्यात आंग्ल कवि त्यांचा आवडता कवि होता. १८७७ मध्यें रवींद्रनाथ इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्यें ते एक वर्षभर होते. पण इंग्रजी-विषयीं त्यांचें मत या सफरींत प्रतिकूल झालें. इंग्लंडहून आल्यावर त्यांनीं आपलीं ‘ युरोपचीं पत्रें ’ प्रसिद्ध केलीं. त्या पाठोपाठ करुणा नांवाची कादंबरी, रुद्रचंद्र हें खंडकाव्य व भग्नहृदय नाटिका हीं रवींद्रनाथांचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं.

### कारवार

१८८३ मध्यें रवींद्रनाथ भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या कारवार शहरीं आले. कारवारचा सृष्टिसौंदर्यानें नटलेला प्रदेश रवींद्र-

नाथांना अतिशय आवडला. त्या काव्यमय पार्श्वभूमीवर या महाकवीनें आपला बराच काळ काढला.

याच वर्षी डिसेंबर महिन्यांत रवींद्रनाथांचा विवाह झाला.

आपली 'संन्यासी' व 'माथर खेला' हीं नाटकें व 'प्रभात–संगीत' हें काव्य रवींद्रनाथांनीं कारवारच्या सफरीनंतरच लिहिलें. 'आलोचना' या त्यांच्या पुस्तकांत त्यांचे लेख संग्रहित केले आहेत.

## पुरोगामी

याच सुमारास सामाजिक व राजकीय विषयांवरचीं आपलीं मतें रवींद्रनाथ प्रकट करूं लागले. शिक्षणक्षेत्रांतील प्रश्नाविषयींहि त्यांनीं याचवेळीं आपले विचार सांगितले. तरुण बंगाली लेखकांत त्यामुळें रवींद्रनाथांची कीर्ति वाढूं लागली. बंकिमचंद्र चतर्जींची नि त्यांची बरीच मैत्री होती. पण पुढें बंकिमबाबूंची धार्मिक मतें रवींद्रनाथांना पटलीं नाहींत व त्यांची मैत्री संपुष्टांत आली.

१८९७ ते १९०० या तीन वर्षांत रवींद्रनाथांचीं पांच पुस्तकें प्रसिद्ध झालीं. तीं म्हणजे कल्पना, कथा, काहिणी, कणिका व क्षणिका हीं होत. हीं पांचहि पुस्तकें काव्याचीं होतीं.

## संपादन

१९०१ सालीं वंगदर्शन हें मासिक पुन्हां सुरू करण्याचें ठरलें. पूर्वी तें बंद पडलें होतें. रवींद्रनाथांची या मासिकाचे संपादक म्हणून योजना झाली. 'वंगदर्शन' मासिकाची संपादकीय सूत्रें हातीं येतांच 'आपण कादंबऱ्या लिहाव्यात' असें रवींद्रनाथांना वाटूं लागलें आणि मनांत येतांच त्यांनीं कादंबरीलेखन सुरूहि केलें. त्यांच्या कादंबऱ्या 'वंगदर्शन' या त्यांच्या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाल्या. १९०१ ते १९०७ या सात वर्षांत त्यांनीं चार पांच कादंबऱ्या लिहिल्या. त्यांतल्या 'नौकाडुबी' व 'किम्' या कादंबऱ्या विशेष गाजल्या. त्यांची 'गोरा' ही प्रसिद्ध इंग्रजी कादंबरी मूळ बंगाली 'किम्' चेंच रूपांतर होय.

## कादंबरीकार

या कादंबरी लेखनामुळें अव्वल दर्जाचे कादंबरीकार म्हणूनहि रवींद्रनाथांची कीर्ति पसरली.

## शोकाकुल रवींद्रनाथ

१९०२ सालीं रवींद्रनाथांची पत्नी मृत्यु पावली. त्यांचे अठरा वर्षांचें वैवाहिक जीवन अशा रीतीनें अचानक संपलें. रवींद्रनाथांच्या कविहृदयावर त्यामुळें फार मोठा आघात झाला. शोकाकुल होऊन त्यांची स्थिति चमत्कारिक होऊन गेली. ते हिमालयांत या काळांतच खूप भटकले. आपल्या मनांत निर्माण झालेल्या वैराग्याला त्यांनीं अशी वाट करून दिली. याच वर्षी त्यांनीं बोलपूरनजीक आपल्या आश्रमाची स्थापना केली.

हाच आश्रम पुढें ‘ शांतिनिकेतन ’ म्हणून प्रसिद्धीस आला.

## इंग्रजी साहित्यांत पाऊल

या बोलपूरजवळच्या आश्रमांत त्यांनीं दीड वर्ष काढलें व या आश्रमांत राहून मनाची पूर्वावस्था प्राप्त करून घेतली. लेखनास जोमानें आरंभ केला. इतके दिवस रवींद्रनाथ केवळ बंगालींतच लिहित होते पण या वेळीं त्यांनीं इंग्रजींतहि लेखन करण्यास प्रारंभ केला. त्रिखंड कीर्ति संपादन करावयाची असेल तर आंग्ल भाषेंतहि लेखन केलें पाहिजे हें त्यांच्या मनाला पटलें. व त्यांनीं तो विचार कृतींतहि उतरवला.

आंग्ल भाषेंत लेखन सुरू केल्यावर रवींद्रनाथ तिसऱ्यांदा इंग्लंडला निघाले.

रवींद्रनाथांची ही तिसरी इंग्लंडची सफर त्यांना फारच फायदेशीर ठरली. या सफरीला जातांना त्यांनीं आपलें सर्व इंग्रजी साहित्य बरोबर घेतलें.

## यीट्‌स्‌ची भेट

इंग्लंडला गेल्यावर त्यांनीं आपलीं पुस्तकें श्रेष्ठ इंग्रज कवि यीट्‌स्

याला दाखविलीं. यीट्सनें रवींद्रनाथांची कविता वाचली मात्र, तो तत्क्षणींच त्यांच्यावर बेहद्द खूष झाला !

### इंग्लंडचें वंदन

मग रवींद्रनाथांनीं आपलीं काव्यें व नाटकें इंग्रजींत प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला. इंग्लंड अमेरिकेंत त्यांना लोकप्रियता लाभूं लागली. साऱ्या आंग्लविश्वानें त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला.

### विजयी वीर

एखाद्या विजयी वीरासारखे रवींद्रनाथ भारताला परतले.इंग्लंडला जातांना ते केवळ बंगालचे कविराज होते, परत येतांना कविसम्राट् झालें ! भारतीय जनतेनें परमुलखांत विजयी होऊन आलेल्या या कविश्रेष्ठाचे मनःपूर्वक स्वागत केलें, व त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव केला.

### नोबेल पारितोषिक

१९१३ सालीं गीतांजलि या काव्यसंग्रहाबद्दल रवींद्रनाथांना नोबेल पारितोषिक देण्यांत आलें. रवींद्रनाथांना तेव्हां तर सारा भारत डोक्यावर घेऊन नाचला ! एका भारतीय कवीनें जगांतलें सर्वश्रेष्ठ वाङमयाचें पारितोषिक पटकावलें होतें आणि परतंत्र असूनहि भारत कलेच्या प्रांतांत किती समृद्ध आहे हें जगाला दाखवून दिलें होतें !

### स्तुतिसुमनांचा वर्षाव

रवींद्रनाथांवर त्यावेळीं अभिनंदनाचा प्रचंड वर्षाव झाला. साऱ्या जगांतून त्यांना लक्षावधि अभिनंदनाचीं पत्रें आलीं. मुलाखती व लेख लिहिण्यांस निमंत्रणें किती आलीं याची गणतीच नाहीं. सरकारनें त्यांना ‘ सर ’ ही पदवी दिली व कलकत्ता विद्यापीठानें त्यांना ‘ डॉक्टर ऑफ लिटरेचर ’ ही उच्च सन्मानाची पदवी अर्पण करण्यांत धन्यता मानली.

### गीतांजलि

ज्या ‘ गीतांजलि ’ या काव्यसंग्रहामुळें रवींद्रनाथांना नोबेल पारि-

तोषिक मिळालें त्या 'गीतांजलि' या संग्रहांतील काव्यें म्हणजे भारतीय संस्कृतीचें दर्शन आहे. 'गीतांजलि' हा रवींद्रवाङ्मयमंदिराचा कळसच आहे असें म्हटलें तर तें योग्य ठरेल. रवींद्रनाथांना वेळोवेळीं सुचलेले अनेक काव्यविचार या संग्रहांत एकत्रित करण्यांत आले आहेत. यांतील बहुतेक काव्यें परमेश्वराला उद्देशूनच लिहिलेलीं आहेत. आणि तीं बहुशः भक्तिगीतें आहेत. 'गीतांजलींत' एकंदर १०३ गीतें आहेत.

## गीतनिर्झर

गीतांजलींतील गीतें म्हणजे व्याकुल हृदयाची तृषा शमविणारे झरेच आहेत. ज्या वेळीं आपल्या मनाला अत्यंत उदास वाटतें, व्याकुलतेनें मन भरून जातें तेव्हां गीतांजलींतील काव्यकुसुमें मनाला दिलासा देतात. असमाधानी आणि अतृप्त मनाला 'गीतांजलि' म्हणजे एक अमोल ठेवाच वाटेल.

## रूपांतरें

'गीतांजलि' मूळ बंगालींत लिहिली आणि इंग्रजी भाषेंत रवींद्रनाथांनींच तिचें रूपांतर केलें. तें इतकें सरस वठलें आहे कीं, कोणा श्रेष्ठ इंग्रज कवीनेंच ही रचना केली आहे असें वाटावें! इंग्रजी गीतांजलीला सुप्रसिद्ध आंग्ल कवि यीट्स् यांची सुबोध प्रस्तावना आहे.

गीतांजलीचें रूपांतर सर्व भारतीय भाषांत तर झालें आहेच; पण फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश, जपानी, ब्रह्मी, चिनी इत्यादि युरोपीय व आशियाई देशभाषांतहि झालें आहे.

## जपान व अमेरिका

१९१६ मध्यें रवींद्रनाथांनीं जपानला भेट दिली. तेथें त्यांनीं राष्ट्रीयतेवर व्याख्यानें दिलीं. अध्यात्म हें त्यांच्या व्याख्यानाचें सूत्र होतें! जपान त्या वेळीं आधिभौतिक बाबतींत उन्नत असल्यामुळें

जपानी लोकांना रवींद्रनाथांची विचारसरणी पटली नाहीं व त्यांच्यावर टीका झाली.

जपानमधून रवींद्रनाथ अमेरिकेला गेले. अमेरिकेंत त्यांचें भव्य प्रमाणांत स्वागत झालें. तेथें त्यांनीं ' व्यक्तित्व ' या विषयावर व्याख्यानें दिलीं. या व्याख्यानामुळें अखिल अमेरिकेंत त्यांची कीर्तिध्वजा फडकली.

## संतप्त सौजन्य

१९१९ सालीं देशांतील तप्त वातावरण पाहून कविहृदयाचे सौजन्यशील रवींद्रनाथहि संतप्त झाले. पंजाबमधील अत्याचार व अमृतसरच्या जालियनवाला बागेंतील अमानुष कत्तलीमुळें रवींद्रनाथ बेचैन झाले व त्यांनीं सरकारनें दिलेल्या ' सर ' या पदवीचा त्याग केला ' अशा परिस्थितींत सरकारी पदव्या धारण करणें ही नामुष्कीची व नाचक्कीची गोष्ट आहे. ' असें त्यांनीं यासंबंधीं व्हाईसरायला लिहिलेल्या पत्रांत लिहिलें होतें !

१९२० सालीं पुन्हा एकदां इंग्लंडला जाऊन आल्यावर १९२४ सालीं रवींद्रनाथ आणखी एकदा इंग्लंडला गेले. जगांतील बहुतेक सर्व देशांत ते हिंडून आलेले आहेत.

## साम्यवादी रशिया

युरोपची व अमेरिकेची सफर केल्यानंतर १९३० मध्यें रवींद्रनाथ रशियाला गेले. रशियानें साम्यवादी विचासरणीचा स्वीकार करून दहा वर्षें लोटली होतीं. रशियांतील उद्योगधंदे, शेती, शिक्षण इत्यादि बाबतींतली रचना पाहून रवींद्रनाथांनीं संतोष व्यक्त केला. रशियाची नवसमाजरचना त्यांना मनापासून आवडली व तसें त्यांनीं आपल्या लेखनांतून व भाषणांतून अनेकदां व्यक्तहि केलें. ' रशियाचीं पत्रें ' या त्यांच्या बंगाली पुस्तकांत त्यांचे रशियाविषयक विचार ग्रथित करण्यांत आले आहेत. ' सोविएत सिस्टिम ' हें पुस्तकाचें इंग्रजी रूपांतर.

### शांतिनिकेतन

अनेक देशांना भेटी देऊन आल्यानंतर रवीन्द्रनाथांनीं स्वतःची शिक्षणसंस्था उभारावयाचा बेत पक्का केला. विश्वभारती शिक्षण-संस्थेचें शांतिनिकेतन हें विद्यालय त्यांनीं बोलपूरनजिकच्या आपल्या आश्रमांत सुरू केलें. निसर्गाच्या सुंदर वातावरणांत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास त्यांनीं सुरुवात केली.

### विद्याकलेचें माहेरघर

विद्येबरोबर कलेचेंहि विश्वभारती हें पीठ व्हावें म्हणून उत्तमोत्तम चित्रकारांना व संगीतज्ञांना रवींद्रनाथांनीं शांतिनिकेतनमध्यें बोलाविलें. स्वतः रवींद्रनाथ चित्रकार व संगीतज्ञ होतेच. जीवनाचे बहुविध शिक्षण देणारी ही संस्था अल्पावधींतच लोकप्रिय झाली. केवळ भारताच्या अनेक प्रांतांतूनच नव्हे तर जगांतील निरनिराळ्या देशांतील विद्यार्थी शांतिनिकेतनमध्यें शिक्षण घेण्यासाठीं येऊं लागले व शांतिनिकेतन म्हणजे जगांतल्या ज्ञानेच्छूंची एक संघटनाच झाली !

### राजकारणाशीं संबंध

राजकारणाच्या बाबतींत रवींद्रनाथांनीं फारसें लक्ष घातलें नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. फक्त १८८६ सालीं कलकत्त्याला झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाला ते हजर होते. मात्र १९०५ च्या वंगभंगाच्या चळवळींत रवींद्रनाथांनीं महत्त्वाचा भाग घेतला. वंगभंगाला विरोध करणारीं अनेक भाषणें त्यांनीं केलीं व लेखहि लिहिले.

### माघार

पण पुढें काय झालें कुणास ठाऊक ! एकदम रवींद्रनाथांना या चळवळीचा वीट आला व ते शांतिनिकेतनांत निघून गेले. काव्यलेखन व चिंतन यांतच उरलेलें आयुष्य व्यतीत करण्याचा निश्चय करूनच त्यांनीं चळवळींतून अंग काढून घेतलें. त्यांच्या या वृत्तीमुळें त्यांच्यावर टीकाहि बरीच झाली पण त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें.

## हिजलीचा गोळीबार

यानंतर रवींद्रनाथांनीं १९३१ सालीं हिजलीच्या गोळीबाराच्या वेळीं राजकीय प्रश्नावर विचार व्यक्त केले. बंगाल्यांतील हिजली या गांवीं तुरुंगांत असलेल्या निःशस्त्र राजबंद्यांवर गोळीबार करण्यांत येऊन त्यांत एक राजबंदी ठार व अनेक जखमी झाले. सरकारचें हें दुष्कृत्य पाहून जनता संतप्त झाली. सरकारचा सर्वत्र तीव्र शब्दांत निषेध झाला.

—आणि शांतिनिकेतनच्या सांस्कृतिक कोषांत बद्ध झालेल्या रवींद्रनाथांच्या कानावर तो आवाज पोंचला. रवींद्रनाथ ती हकीगत ऐकून बेचैन झाले व कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्यें भरलेल्या निषेधाच्या सभेचें त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. आपल्या तेथील भाषणांत त्यांनीं हिजली गोळीबाराचा तीव्र व जळजळीत शब्दांत निषेध केला.

## अमर रवींद्रनाथ

पण त्यानंतर रवींद्रनाथांनीं आपलें बहुतेक सर्व जीवन शांतिनिकेतनच्या सेवेंत घालवलें. दिनांक ७ ऑगस्ट १९४१ रोजीं परतंत्र भारताची जगांत मान उंचावणारा हा महापुरुष अस्तंगत झाला, पण गीतांजलीच्या रूपानें रवींद्रनाथ अमरच आहेत.

# रवींद्र-विचार

★ जेथें शेतकरी उन्हांत व पावसांत आपली नाठाळ जमीन नांगरत आहेत, जेथें मजूर मोठ्या श्रमानें खडी फोडीत आहेत व जेथें झाडू रस्ते साफसूफ करीत आहेत तेथें परमेश्वराचें अधिष्ठान आहे.

— ( गीतांजलि ११ )

★ परमेश्वराकडे जाण्याचे मार्ग फार कठीण, अडचणीचे व लांबचे आहेत. सोपा असा एकच मार्ग आहे. तो म्हणजे मधुर व प्रेमळ गायनाचा.

— ( गीतांजलि १०१ )

★ जगांतील सर्व राज्ययंत्रांची उभारणी पाशवी शक्तीवर झालेली आहे. अशा संघटित पाशवी शक्तीला तोंड देण्याचें सामर्थ्य अहिंसेंत आहे, असा माझा दृढ विश्वास आहे; पण प्रत्येक नैतिक तत्त्वाप्रमाणें अहिंसा ही अन्तर्हृदयांतून उद्भुत झाली असली पाहिजे.

★ अनुभवानें मला आतां खात्रीपूर्वक असें वाटूं लागलें आहे कीं, वाहत्या प्रवाहाप्रमाणें लहान मुलें लवचिक व प्रभावी असतात. ही गोष्ट विसरून मोठ्या माणसाच्या वागणुकीचें प्रमाण लहान मुलांच्या वागणुकीला लावणें व त्या दृष्टीनें लहान मुलांच्या वागणुकीचा बरेंवाईटपणा ठरविणें ही चुकीची गोष्ट आहे.

★ ज्ञानविज्ञानाविषयीं मनुष्याला वाटणारे निःस्वार्थी प्रेम आणि भूतदया यांवर सुधारणेची उभारणी होत असते. कला म्हणजे व्यक्तिविशिष्ट भावनेचा आविष्कार. मनुष्याच्या अंतःकरणांतील मधुर भावनांना हालविणारा मधुर भाव म्हणजेच रसकला, म्हणजे आत्माविष्कार. मनुष्याचें जीवन 'सत्यं शिवं सुंदरम्' करणें हें कलेचें ध्येय.

* आजकालची आपली स्थिति पाहिली तर दररोजच्या ठराविक चाकोरीपलीकडे जावयाचें नाहीं अशी आपली एकंदर वागणूक आहे. वर्तमानपत्रांतील हकिगती वाचण्यापलीकडे आपण अधिक कांहींच करीत नाहीं. ह्या वर्तमानपत्रांनीं आपलें जीवन अगदीं नीरस केलें आहे. त्यांच्या योगानें आपल्या अंगीं केवळ वरवर पाहण्याची दृष्टि उत्पन्न केल्यामुळें खोल तत्त्वज्ञानांत शिरावयाची आपल्याला इच्छा उत्पन्न होत नाहीं.

* विश्वबंधुत्व हें माझ्या शिक्षणसंस्थेचें ध्येय आहे. निरनिराळ्या देशांचे आणि निरनिराळ्या संस्कृतींचे लोक ज्या ठिकाणीं बसून विचार-विनिमय करूं शकतील असें ठिकाण माझ्या शिक्षणसंस्थेशिवाय दुसरें सांपडणार नाहीं.

* पुण्यसंचय केल्यानेंच स्वर्ग प्राप्त होतो असें लोक म्हणत आले आहेत. पण मी म्हणतों कीं, पुण्याईच्या जोरावरच मी स्वर्गाहून या मृत्युलोकीं आलों आहें, स्वर्गातल्या संकुचित स्थानीं माझ्या ठायीं सर्व प्रकारें अपूर्णता असतांहि मी माझ्या मृत्युलोकीं येऊन स्वर्गाला धन्य केलें.

* आर्थिक आणि राजकीय तत्त्वांवर उभारलेलें आणि त्या तत्त्वांनीं जखडलेलें राष्ट्र 'राष्ट्र' या संज्ञेस प्राप्त होत नाहीं. राजकारण हें समाजाचें ध्येय नाहीं. समाजाला आपलें अस्तित्व राखण्यासाठीं ह्या भानगडींत पडावें लागतें. मानवजातीची पूर्णावस्था हें राष्ट्राचें ध्येय आहे. राष्ट्र हें सामाजिक जीवनाचा आदर्श असला पाहिजे. राजसत्ता आणि व्यापार यांच्या मोहांत गुरफटलेलें राष्ट्र अखिल मानवजातीला अवनतीला नेणारें आहे.

◆ ◆ ◆

म. ग्रं. सं. ठाणे.
बा. क्र. ११३९४
दि.
IRBK-0111394

बाळ, माझ्या हृदय–वीण्याच्या मंजुळ संगीताचे पडसाद तुझ्या भावी आयुष्यांत, तुझ्या आसमंतांत सारखे साद घालतील.

जेव्हां तूं एकटा असशील तेव्हां तुझ्या सोबतीस सवंगडी म्हणून ते तुझ्याजवळ बसतील नि तुला छान छान गोष्टी सांगून तुझें मनोरंजन करतील. जेव्हां तूं अलोट जनसंमर्दांत सांपडून वाट न दिसल्यानें गांगरून जाशील तेव्हां तेथेंहि आपल्या अदृश्य स्वरूपांत तुझें रक्षण करण्यास ते धांवत येतील.

काळयाकुट्ट रात्रीच्या भयद समयीं तूं आपला एकाकी मार्ग आक्रमीत असतां आपल्या अंधुक प्रकाशशलाकांनीं तुला मार्गदर्शन करणाऱ्या नितांत सुंदर नि लुकलुकणाऱ्या तारकेप्रमाणें ते तुझे सवंगडी होतील. तुझ्या सुंदर नेत्रकमलांतील पाकळयांत ते हळूच येऊन बसतील नि स्वर्गीय सृष्टीच्या अंतरात्म्याशीं तुझ्या कोमल दृष्टीची ते सुरेख सांगड घालून देतील.

बाळ, माझा हृदय–वीणा माझ्या अंतानंतरहि आपल्या कोमल तारा छेडीत तुझ्या कल्याणासाठींच मंजुळ संगीताची खैरात करील. मातेचा हृदय–वीणा इतर वीण्यांहून कितीतरी निराळा असतो याची प्रचीति अशा वेळीं तरी मुलाला अवश्य येऊं शकते.

या पार्थिव देहांतून माझा आत्मा निघून गेल्यानंतर, व्यक्त स्वरूपांतील माझी वाणीहि अव्यक्तांत विलीन होऊन जाईल; पण माझ्या हृदयवीण्याऱ्या संगीताचे पडसाद तुझ्या कोमल अंतःकरणांशीं प्रेमानें अखंड नि अविरत खेळत राहतील.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ग्रंथालय शाखा.
अनुक्रमांक 06767 दि. 01/09/13.14
ग्रंथांक 3439 नोंदणी 3013109